## ‘मराठा समाजाला न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न’



**छत्रपती संभाजीनगर** : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा आरक्षण याचिकाकर्ते विनोद पाटील यांची भेट घेतली. या संदर्भात माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, मी मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला आरक्षण द्यायचे प्रामाणिक प्रयत्न केले. आरक्षण दिले आणि टिकवले. आण्णासाहेब पाटील महामंडळाच्या माध्यमातून एक लाख तरुणांना रोजगार दिले. ‘सारथी’च्या माध्यमातून स्पर्धा परीक्षेसाठी मदत केली. मराठा समाजाला आरक्षण द्यायचा विषय होता त्या वेळी विनोद पाटील यांची विशेष मदत झाली. मराठा समाजाला आरक्षण कसे द्यायचे, कसे टिकवायचे याबाबत त्यांची मदत झाली. उच्च आणि सर्वोच्च न्यायालयात याचिका असताना विनोद पाटीलांनी मदत केली. त्यामुळे संभाजीनगरमध्ये असताना त्यांची भेट घ्यायला आलो. ही राजकीय नाही, तर कौटुंबिक भेट आहे, असेही त्यांनी सांगितले.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ११४
www.ramprahar.com

रविवार, १० नोव्हेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


अंतरंग


मतदानासाठी १२ प्रकारचे ओळखपत्र पुरावे ग्राह्य/२

‘रविप्रहर’मध्ये वाचा विविध विषयांवरील लेख/४

रणजी ट्रॉफीत मुंबईने चारली ओडिशाला धूळ/८


# महायुतीच्या उमेदवारांना निवडून द्या

## मंत्री रवींद्र चव्हाण यांचे आवाहन ; अलिबागमध्ये भाजप जिल्हा कार्यालयाचे उद्घाटन

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात महायुतीची सत्ता आणायची आहे. त्यामुळे मानपानाचा विचार न करता विधानसभा निवडणुकीत रायगड जिल्ह्यातील महायुतीचे उमेदवार निवडून आणण्यासाठी प्रयत्न करा. अलिबाग विधानसभा मतदारसंघात आमदार महेंद्र दळवी हे महायुतीचे उमेदवार असून त्यांना विजयी करण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करा, असे प्रतिपादन राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी केले.

अलिबागमध्ये भाजप दक्षिण रायगड जिल्हा कार्यालय सुरू करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन शनिवारी (दि. ९) मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते





कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते.

या कार्यक्रमास भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील, ज्येष्ठ नेते सतीश धारप, सहकार आघाडीचे कोकण विभाग सहसंयोजक गिरीश तुळपुळे, भाजप जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, मिलिंद पाटील, बिपीन म्हामुणकर, गीता पालरेचा, उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, राजेश मपारा, ॲड. पल्लवी तुळपुळे, अलिबाग तालुका अध्यक्ष उदय काठे, जिल्हा चिटणीस सतिश लेले, कोषाध्यक्ष हेमंत दांडेकर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना मंत्रीमहोदयांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.

दिल्लीत भाजपचे कार्यालय आहे तसे प्रत्येक जिल्ह्यात कार्यालय असले पाहिजे असे पक्षाने ठरविले आहे. त्यानुसार अद्ययावत कार्यालय बांधण्यास सुरुवात करण्यात आली आहे. सिंधुदुर्ग व ठाणे जिल्ह्यात कार्यालये बांधण्यात आली आहेत. रायगड जिल्ह्यातदेखील अलिबागमध्ये कमळ भवन उभारण्यात येईल, असे सांगून भाजपचे कार्यालय जनसामान्यांना आपले कार्यालय वाटले पाहिजे. **(पान २ वर..)**

# विविध प्रकल्पांमुळे पुढच्या पिढीला पनवेलमध्येच रोजगार मिळणार -आमदार प्रशांत ठाकूर

## शिवसेनाप्रणित संघटनांकडून पाठिंबा जाहीर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल परिसरात आलेल्या विविध प्रकल्पांमुळे आता पुढच्या पिढीला पनवेलमध्येच रोजगार मिळणार आहे, असे प्रतिपादन महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांनी शनिवारी (दि. ९) येथे केले.

शिवसेनेचे महानगरप्रमुख ॲड. प्रथमेश सोमण व पदाधिकाऱ्यांच्या पुढाकाराने झालेल्या बैठकीत शिवसेनाप्रणित शिवप्रेरणा श्रमिक कामगार संघटना आणि एकता चालक मालक संघटनेने महायुतीचे उमेदवार प्रशांत ठाकूर यांना पाठिंबा जाहीर केला. त्या वेळी ते बोलत होते.

या बैठकीस शिवसेनेचे महानगरप्रमुख ॲड. प्रथमेश सोमण, उपमहानगरप्रमुख महेश सावंत, शहरप्रमुख प्रसाद सोनावणे, विभागप्रमुख किरण पवार, प्रसिद्धीप्रमुख तौफिक बागवान, उपशहरप्रमुख मच्छिंद्र झगडे, शिवप्रेरणा श्रमिक कामगार संघटनेचे अनिल गागडा, अनिल धोत्रे, प्रदीप इंदवटकर, रमेश बैद, भगवान पाटील, बाळू मंजुळे, एकता चालक मालक संघटनेचे शशिकांत सावंत, अझमत डोलारे, इतर पदाधिकारी उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुढे बोलताना सांगितले की, पनवेल परिसरात विमानतळ, मेट्रो आणि त्या अनुषंगाने सेवा-सुविधा वाढणार आहेत. त्याचबरोबर तळोजात ८० हजार कोटी रुपयांचा सेमी कंडक्टर प्रकल्प येणार आहे. त्यामुळे या ठिकाणी रोजगाराची मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होणार असून भावी पिढीला रोजगार, नोकरीसाठी बाहेर जावे लागणार नाही, तर पनवेलमध्येच ही संधी मिळणार आहे. **(पान २ वर..)**

### विरोधकांच्या भूलथापांना बळी पडू नका -शिवसेना नेते ॲड. प्रथमेश सोमण

या वेळी ॲड. प्रथमेश सोमण यांनी म्हटले की, आमदार प्रशांत ठाकूर यांनी कधीही राजकारण केले नाही. कुठल्याही पक्षाचा किंवा संघटनेचा व्यक्ती असो त्याच्या प्रश्नाची सोडवणूक करण्याचे काम त्यांनी केले आहे. पक्ष संघटना म्हणून आम्ही त्या वेळी विरोधी पक्षात असतानाही त्यांनी कधीच राजकारण केले नाही. कामगार आणि रिक्षाचालकांच्या हितासाठी त्यांनी नेहमीच सहकार्य केले. रिक्षाचालकांमध्ये काही जण फूट पाडतात, पण ते आपण होऊ द्यायचे नाही, असे सांगतानाच विरोधक हिंदू-मुस्लिम असे राजकारण करतील, मात्र विरोधकांच्या भूलथापांनाव अप्रचाराला बळी पडू नका, असे आवाहन त्यांनी कामगार आणि रिक्षाचालकांना केले. आमदार प्रशांत ठाकूर विजयाचा चौकार मारण्यासाठी सज्ज आहेत. फक्त त्यांना मताधिक्य द्यायचे आहे, असेही सोमण यांनी स्पष्ट केले.

# महाराष्ट्रात महायुतीचेच सरकार हवे -पीएम मोदी



**नांदेड : प्रतिनिधी**

महाराष्ट्रामध्ये काँग्रेसच्या पापाला अनेक वर्ष सहन करावे लागले आहे. काँग्रेस सरकारने येथील शेतकऱ्यांच्या सुख-दु:खाची पर्वा केली नाही. दुष्काळापासून तुम्हाला दूर करण्यासाठी आम्ही अनेक पावले उचलली आहेत. विकसित महाराष्ट्रासाठी महायुतीचेच सरकार राज्यात पाहिजे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (दि. ९) नांदेड येथे केले. नांदेडवरून जाणाऱ्या शक्तीपीठ महामार्गामुळे पूर्ण मराठवाड्याच्या अर्थव्यवस्थेला नवी उंची मिळेल, असा विश्वासही त्यांनी या वेळी व्यक्त केला.

पुढे बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज मी डबल ड्युटी करत आहे. एकतर मी देशासाठी मदत मागत आहे आणि याशिवाय महाराष्ट्राच्या उज्वल भविष्यासाठीही आशीर्वाद मागत आहे. नांदेड लोकसभा क्षेत्रातील लोकांना दोन वेळेस मतदान करायचे आहे. हरियाणाच्या निवडणुकीत भाजपला पहिल्यापेक्षा जास्त जागा मिळाल्या आहेत. आता हाच इतिहास महाराष्ट्रातील जनतादेखील रचणार आहे. मागील दोन दिवसांपासून मी जेथे जेथे गेलो, तेथे लोकांमध्ये मला जाणवले की, लोकसभेला राहिलेली कसर विधानसभेला भरून काढली जाईल.

# केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची आज कामोठ्यात सभा

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार आणि लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रचारार्थ केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा आरपीआयचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांची रविवारी (दि. १०) सायंकाळी ७ वाजता कामोठे येथे जाहीर सभा होणार आहे.

कामोठे से. ११मधील सुषमा पाटील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे होणाऱ्या या सभेला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर,



आमदार विक्रांत पाटील, भाजपचे प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते भीमसेन माळी, शिवदास कांबळे, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, प्रभाकर कांबळे व महायुतीतील इतर पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

## निवडक

### पाकिस्तानच्या क्वेटा स्टेशनवर बॉम्बस्फोट, २१ जणांचा मृत्यू

**क्वेटा** : पाकिस्तानच्या बलुचिस्तानमधील क्वेटा रेल्वेस्थानकावर शनिवारी (दि. ९) भीषण बॉम्बस्फोट झाला असून यात २१ लोकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे, तर ४६ जण गंभीर जखमी असल्याचे सांगितले जाते. प्राथमिक तपासानुसार ही घटना आत्मघातकी स्फोटाची असल्याचा अंदाज क्वेटाचे पोलीस अधीक्षक मोहम्मद बलोचवस यांनी पीटीआयशी बोलताना व्यक्त केला. बलोच लिबरेशन आर्मीने या हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे. स्फोटानंतर बचावकार्य व तपास सुरू करण्यात आलाय.

### मी जेवढा कडवट हिंदुत्ववादी, तेवढाच कडवट मराठी : राज

**पुणे** : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शनिवारी (दि. ९) पुण्यात सभा घेतली. या सभेत बोलताना त्यांनी अनेक मुद्द्यांवर भाष्य केले. मी जेवढा कडवट हिंदुत्ववादी आहे तेवढाच कडवट मराठी आहे. बंगाली भाषिक लोकांना विचारा. ते घरी आल्यावर ते काय करतात, तर ते सांगतात आम्ही रविंद्रनाथ टागोर यांचे संगीत ऐकतो. सिंगापूरमध्ये एक बाई रेडिओवर तमिळ गाणं ऐकत होती. याबाबतीत आपण कडवट असले पाहिजे, असे ते म्हणाले

# पनवेलच्या ग्रामीण भागात महायुतीचा झंझावात

## आमदार प्रशांत ठाकूर यांचा प्रचार दौरा; जोरदार स्वागत



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय आणि मित्रपक्ष महायुतीचे पदाधिकारी हे स्वतःला उमेदवार समजून पनवेल विधानसभा मतदारसंघात प्रचार करत आहेत. त्यामुळे जनतेची साथ आमदार प्रशांत ठाकूर यांना मोठ्या प्रमाणात मिळत असून त्यांचा झंझावाती प्रचार संपूर्ण मतदारसंघात सुरू आहे. त्यानुसार शुक्रवारी (दि. ८) ग्रामीण भागात प्रचार झाला. ग्रामस्थांकडून त्यांचे स्वागत करण्यात आले.

या वेळी हरिग्राम, केवाळे, वाकडी,



खानाव, मोर्बेगाव, कुत्तरपाडा, मोहोदर, महाळुंगीमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रचार केला. विकासाची गंगा ज्या पद्धतीने आपल्या भागात वाहत आहेत त्याच पद्धतीचा येणाऱ्या काळातही विकास सुरू राहण्यासाठी येत्या २० तारखेला कमळासमोरील बटन दाबून मला विजयी करा, असे आवाहन त्यांनी मतदारांना केले.

या प्रचारावेळी भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस भूपेंद्र पाटील, माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत, महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्ष कमला देशेकर, सरपंच आनंद ढवळे, भाजप नेते एकनाथ देशेकर, शिरवली विभाग अध्यक्ष शिवाजी दुर्गे, अशोक शेळके, कामगार नेते रवी नाईक यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

# एक्स्प्रेस वेवर बस ट्रकला धडकली; ३६ प्रवासी जखमी, आठ गंभीर

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर एका उभ्या असलेल्या ट्रकला खासगी बसने मागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात ३६ प्रवासी जखमी आहेत. यातील आठ प्रवासी गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. हा अपघात शनिवारी (दि. ९) पहाटे पाचच्या सुमारास खोपोली हद्दीत आडोशी बोगद्याजवळ झाला. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार एक्स्प्रेस वेने पुण्याहून मुंबईला जाणारा केए ५६-५६७५ या क्रमांकाच्या ट्रकचा चालक महेश रेड्डी (३१, कर्नाटक) याने ब्रेकची हवा कमी असल्याने ट्रक आडोशी बोगद्याजवळ तिसऱ्या लेनवर उभा केला होता. पहाटे पाचच्या सुमारास मागून येणाऱ्या बाळूमामा ट्रॅव्हल्सच्या खासगी बस (एम ०३-डीव्ही २४१२) वरील चालक बालाजी सूर्यवंशी (४१, लातूर) याचे नियंत्रण सुटून बसने उभ्या असलेल्या ट्रकला जोरदार धडक दिली.

या अपघातात बसमधील ३६ प्रवासी जखमी झाले. यापैकी मनीषा भोसले, सुनिता तराळ, बालाजी सूर्यवंशी (चालक), संकेत घारे (सहचालक), अभिजित दिंडे, सरिता शिंदे, संदीप मोघे व मीनाक्षी कांबळे हे आठ प्रवासी गंभीर जखमी आहेत. त्यांना तातडीने कामोठे (पनवेल) येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले असून उर्वरित प्रवाशांवर खोपोलीतील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघातामुळे काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. आयआरबी, देवदूत, वाहतूक पोलीस, खोपोली पोलीस, अपघातग्रस्त मदतीसाठी टीमचे सदस्य यांनी घटनास्थळी दाखल होत मदतकार्यात भाग घेतला व अपघातग्रस्त वाहने बाजूला केली. त्यानंतर हळूहळू वाहतूक पूर्ववत करण्यात यश आले.

# वातावरणात गारवा... गुलाबी थंडीची चाहूल!



**माणगाव : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून थंडीचा जोर वाढू लागला आहे. ऑक्टोबर महिन्यात उन्हाची तीव्रता वाढल्याने असह्य उकाडा जाणवत होता, परंतु आता सकाळी थंड हवेचा अनुभव येऊ लागला आहे तसेच धुके दाटत आहे.

थंडीची चाहूल लागल्याने वातावरणात हलकासा गारवा जाणवू लागला आहे. सकाळी दाट धुके व सुखद गारवा हवेत असल्याने पहाटे थंडीचा अनुभव येऊ लागल्याचे चित्र आहे.

हवेतला गारवा वाढल्याने तापमानाचा पाराही घरसला आहे. पुढील काही दिवसात थंडी वाढेल व गुलाबी थंडीचा अनुभव मिळेल असे जाणकार सांगतात. थंडीचे हवामान कडधान्य शेतीला पूरक असल्याने शेतकरीही समाधान व्यक्त करीत आहेत.

थंडी व धुके पडत असल्याने हिवाळ्याच्या दिवसात सकाळी गार हवेत व्यायाम करणारे नागरिक, तरुण, विद्यार्थी आवर्जून घराबाहेर पडत असून व्यायाम, खेळ यांचा आनंद घेत आहेत.

# मुरूडचे समुद्र किनारे सी-गल पक्ष्यांनी गजबजले

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील किनारपट्टीवर मोठ्या संख्येने सी-गल पक्षी अवतरले असून या परदेशी पाहुण्यांनी मुरूडसह राजपुरी, आगरदांडा समुद्र किनारे गजबजले आहेत. किनाऱ्यावर रपेट मारताना सी-गल पक्ष्यांचे थवेच्या थवे दिसत असल्याने ते पर्यटकांचे आकर्षण ठरत आहे.

एकदरा पुलापासून ते नबाबाच्या राजवाड्यापर्यंत अडीच किलोमीटर विस्तीर्ण किनाऱ्यावर वाळू तुडवत विशेषतः सकाळी सी-गल पक्ष्यांची गजबज पाहताना एक वेगळीच गंमत वाटते. या पक्ष्यांच्या लयबद्ध हालचाली, भक्ष्य म्हणून छोटे मासे व खेकडे पकडण्यासाठीची शिताफी, आकाशात विहार करण्याची शैली पाहून पर्यटकांची करमणूक होते. या पक्ष्यांच्या हवेतील सहजसुंदर कसरतीदेखील पाहण्याजोग्या असून हे सर्व अनुभवण्यासाठी अनेकांची



पावले समुद्र किनाऱ्यावर वळलेली असतात.

साधारणपणे ऑक्टोबर ते जानेवारीपर्यंत किनाऱ्यावर सकाळ, संध्याकाळ सी-गल पक्ष्यांचा वावर असतो. विशेषतः थंडीचा हंगाम सुरू होताच या पक्ष्यांची गर्दी वाढायला लागते. त्यामुळे आगामी दोन-तीन महिने समुद्र किनारे या पक्ष्यांनी फुलून जातील. सकाळ, संध्याकाळ समुद्रावर फेरफटका मारणाऱ्या स्थानिकांसह पर्यटकांसाठी ही पर्वणी ठरणार आहे.

थंडीच्या कालावधीत लडाखमध्ये मोठ्या प्रमाणात होणाऱ्या बर्फवृष्टीमुळे सी-गल पक्षी पुरेसे खाद्य आणि वास्तव्याला अनुकूल असलेल्या परिसरात काही कालावधीसाठी दरवर्षी स्थलांतरीत होतात. त्यांची लालचुटूक चोच, पांढरीशुभ्र पिसे आणि देखणे शरीर मन वेधून घेते. यंदा थंडीचा मोसम लांबल्याने या पक्ष्यांचे आगमनदेखील लांबले. आता ते येण्यास सुरुवात झाली आहे. त्यांची प्रचंड संख्या जंगलजेट्टीकडे जाताना आगरदांडा किनाऱ्यावर सकाळी पहावयास मिळते. या पक्ष्यांमुळे किनाऱ्याचा नजारा आणखी उठून दिसतो.

> सी-गल पक्ष्यांचे थवे समुद्र किनारी पाहणे आल्हाददायक वाटते. सुर्यास्ताच्या वेळी तर या विहंगम दृष्याचे वर्णन करणे केवळ शब्दातीत असून ही अनुभूती पर्यटकांनी बचेकंपनीला दिल्यास निसर्गाची खरी ओळख त्यांना होईल.
>
> **-अक्षय बागुल**, पर्यटक, उंड्री, पुणे

# राज्यात साथीच्या आजारांची डोकेदुखी

## हवामान बदलाचा परिणाम; आरोग्य यंत्रणा सतर्क

**मुंबई : प्रतिनिधी**

हवामान बदलामुळे संसर्गजन्य रोगांसाठी पोषक वातावरण झाले असल्याने राज्यात साथीच्या आजारांचा प्रभाव वाढला आहे. राज्यात दहा महिन्यांत मलेरियाचे १७ हजार ७७५ हजाराहून अधिक तर डेंग्यूचे १७ हजार ३८९ रुग्ण आढळले आहेत. या दोन आजारांमुळे आतापर्यंत ३६ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे नागरिकांनी काळजी घेण्याची गरज असल्याचे मत आरोग्य विभागाकडून व्यक्त करण्यात आले आहे.



ऑक्टोबर नोव्हेंबर महिन्यामध्ये डासांच्या पैदासासाठी पोषक वातावरण असल्याचे एका अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. आरोग्य विभागाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात जानेवारी ते ७ नोव्हेंबर या कालावधीत मलेरियाचे एकूण १७ हजार ७७५ रुग्ण आढळले आहेत, तर २० जणांचा मृत्यू झाला आहे. गडचिरोलीमध्ये सर्वाधिक ६ हजार ११९ रुग्ण आहेत आणि ११ जणांचा मृत्यू झाला आहे. त्याचप्रमाणे मुंबईत ६ हजार ६५० तर पाच जणांचा मृत्यू, पनवेल ८१९ आणि चार मृत्यू, ठाण्यात ६५८ रूग्ण आणि एक मृत्यू, चंद्रपूरमध्ये ४३१ आणि दोन मृत्यू, रायगडमध्ये ४३९ रुग्णांची नोंद झाली आहे.

डेंग्यूचे एकूण १७ हजार ३८९ रुग्ण आढळून आले असून, २६ जणांचा मृत्यू झाला आहे. मुंबईत पाच हजार ७० रूग्ण आणि पाच जणांचा मृत्यू, नाशिकमध्ये एक हजार १२१ रूग्ण आणि एक मृत्यू, कोल्हापूर शहरात ४७२ तर जिल्ह्यात ७०९ रुग्ण, सातारा ५०८, पालघर ५०३, नागपूर ४२७ असे रूग्ण आढळून आले आहेत.

### ◆ चिकुनगुनियाचे दीड महिन्यात दुप्पट रुग्ण

*राज्यातील आरोग्य विभागालाही चिकुनगुनिया टेन्शन देत आहे. राज्यात ९ नोव्हेंबरपर्यंत पाच हजार ३५, २१ सप्टेंबरपर्यंत २,१६७ रुग्णांची नोंद झाली होती. गेल्या दीड महिन्यांत दुप्पट वाढ झालेली आहे. यामध्ये नागपुरात सर्वाधिक १०६२, मुंबईत ६११, कोल्हापुरात २८१, पुणे शहर ४४२ आणि जिल्ह्यात २४७, अमरावतीमध्ये २३१ आणि अकोल्यात २३२ रुग्ण आढळले आहेत.*

### ◆ थंडी, तापाचेही रुग्ण वाढले

*थंडीचा हंगाम सुरू झालेला असतानाही उकाडा जाणवत आहे. दिवसा अति उष्ण, तर रात्री थोडेफार थंड असते. त्यामुळे नागरिकांना विविध आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. खोकला, थंडी आणि ताप यांचे मोठ्या संख्येने रुग्ण सध्या शहरात पाहायला मिळत आहेत. अशा बदलत्या वातावरणामध्ये व्हायरल संसर्गाचे प्रमाण अधिक आहे. त्यामध्ये काही प्रमाणात वातावरणात प्रदूषण असल्यामुळे या सर्व गोष्टींचा नागरिकांच्या आरोग्यावर चांगलाच परिणाम होत आहे. या सगळ्या प्रकारामुळे खोकला, थंडी आणि ताप यांचे मोठ्या संख्येने रुग्ण सध्या शहरात पाहायला मिळत आहेत. दरम्यान, डॉक्टरांनी या वातावरणामध्ये विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. गरज पाणी पिणे, हात स्वच्छ धुणे असे सांगितले आहे.*

# मतदानासाठी १२ प्रकारचे ओळखपत्र पुरावे ग्राह्य

**रायगड : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणूकीसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार असून मतदान करण्यासाठी, ज्या मतदारांचे मतदार यादीत नाव आहे, अशा मतदारांकरिता भारत निवडणूक आयोगाने मतदार छायाचित्र ओळखपत्राव्यतिरिक्त इतर १२ प्रकारचे ओळखपत्र पुरावे ग्राह्य धरले जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे, अशी माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ज्या मतदारांकडे छायाचित्रासह मतदार ओळखपत्र आहे, ते मतदार मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करतील.

मतदानावेळी मतदारांना दिलेले निवडणूक ओळखपत्र नसल्यास १२ प्रकारच्या पुराव्यांमध्ये आधार कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागातर्फे छायाचित्रासह वितरित करण्यात आलेले पासबुक, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, पारपत्र (पासपोर्ट), निवृत्तीवेतनाची दस्तावेज, केंद्र अथवा राज्य शासन, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालयाच्यावतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र हे १२ पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत. अनिवासी भारतीयांना त्यांची ओळख पटविण्यासाठी त्यांचा मूळ पासपोर्ट आवश्यक असणार आहे.

एखाद्या मतदाराने मतदार यादीतील आपल्या पत्त्यात बदल केला असेल, पण त्याला अद्याप नवे ओळखपत्र मिळाले नसेल तर आधीचे ओळखपत्र ग्राह्य धरले जाईल, मात्र त्या व्यक्तीचे नाव विद्यमान पत्यासह मतदार यादीत असणे आवश्यक आहे. तसेच सर्व नोंदणीकृत मतदारांना मतदान दिनांकाच्या किमान पाच दिवस आधी मतदान केंद्र, यादी भाग क्रमांक, मतदानाची तारीख, वेळ आदी माहितीच्या चिठ्ठ्यांचे निवडणूक कार्यालयाकडून वितरण केले जाईल. मतदारांनी मतदान केंद्रावर जाताना मतदार माहिती-चिठ्ठी आणि छायाचित्र ओळखपत्रासोबत घेऊन यावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी जावळे यांनी केले आहे.

# मुरूड येथे पोलीस ठाण्यामार्फत पथसंचलन

**मुरूड : प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणूक शांततेत व्हावी तसेच कायद्याचे व शिस्तीचे कोणतेही उल्लंघन होऊ नये तसेच पोलिसांचा धाक कायम रहावा यासाठी मुरूड पोलीस ठाण्याच्या मार्फत पोलिसांचे पथसंचलन करण्यात आले.

मुरूड शहरानजीक असणाऱ्या एकदरा गावातून हे पथसंचालनास सुरुवात करण्यात आली. एकदरा येथून मुरूड शहर बाजारपेठ, मसाल गली येथून जुनी पेठ परिसर तदनंतर दस्तुरी नाका परिसर अश्या अनेक ठिकाणाहून हे पथसंचलन करण्यात आले.



या पथसंचलनास सी.आय. एस.एफ.चे शस्त्रधारी ५० जवान त्याचप्रमाणे स्थानिक पोलीस मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सदरचे पथसंचन डी.वय.एसपी विनीत चौधरी, पोलीस निरीक्षक नामदेव बंडगर यांच्या नेतृत्वाखाली पीएसआय अविनाश राठोड, पीएसआय बळीराम केंद्रे, पीएसआय दीपक राऊळ यांच्यासह असंख्य पोलीस कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टँकरमधून सिलिंडरमध्ये गॅस भरताना आग; तिघे जखमी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रात्रीच्या वेळेस अवैधपणे टँकरमधून सिलिंडरमध्ये गॅस भरत असताना आग लागल्याने वाहनाचे नुकसान झाले आणि तिघेजण जखमी झाले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

४ ऑक्टोबर रोजी रात्री भंगारपाडा, पंकज पार्किंग या ठिकाणी गॅसचा टँकरला आणि शेजारी असलेल्या बलेरो जीपला आग लागल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाली. या ठिकाणी गॅस टँकरच्या पुढील केबिन आणि त्याच्या शेजारी उभ्या असलेल्या बोलेरो जीपला आग लागली होती. या वेळी लागलेले आग अग्निशामक दलाकडून विझवण्यात येत होती. राहुल शंकर खोत हा या आगीमध्ये भाजला. उपचारासाठी त्याला बर्न हॉस्पिटल, ऐरोली येथे नेण्यात आले. त्यानंतर राजन कुमार निषाद आणि सतीश कुमार सुरेश चंद्रकुमार हेदेखील या आगीमध्ये जखमी झाले.

या वेळी गॅस सिलेंडरच्या सहाय्याने जेवण बनवत असताना स्फोट झाल्याने आगीमध्ये जखमी झाल्याची माहिती पोलिसांना देण्यात आली, मात्र सांगितलेली हकीगत आणि घटनास्थळावरील परिस्थिती यात तफावत आढळल्याने जखमी व्यक्तीकडे चौकशी केली असता टँकरमधून गॅस सिलिंडरमध्ये गॅस भरत असताना स्फोट झाल्याचे त्यांनी सांगितले.

या वेळी रिकामे चार सिलेंडर आणि टँकरमधून सिलिंडरमध्ये गॅस भरण्याचे मशीन पोलिसांना आढळून आली. पोलिसांनी पंचनामा करून ते ताब्यात घेतले.

# शेतकऱ्यांना १०० टक्के कर्जमाफी देणार -फडणवीस

**वाशिम : प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि.९) वाशिम जिल्ह्यातील कारंजा लाड येथे महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी जाहीर सभा घेतली. सत्तेत आल्यास शेतकऱ्यांना १०० टक्के कर्जमाफी दिली जाईल, अशी मोठी घोषणा उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी केली.

फडणवीस यांनी जनतेसमोर महायुती सरकारच्या काळात केलेल्या विविध विकासकामांचा आढावा घेतला आणि पुन्हा एकदा महायुतीचे सरकार प्रस्थापित करण्यासाठी मतदारांना आवाहन केले. ते म्हणाले की, महायुती सरकारने राज्यात शेतकऱ्यांसाठी, महिलांसाठी, आणि युवकांसाठी अनेक लोकाभिमुख योजना राबवल्या आहेत. दरम्यान, वाशीम शहरातील शिवसेनेचे माजी नगराध्यक्ष अशोक हेडा यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

पान १ वरुन

## महायुतीच्या उमेदवारांना निवडून द्या

येथून जनसामान्यांचे प्रश्न सुटले पाहिजेत. या कार्यालयातून शासकीय योजना जनसामान्यांपर्यंत पोहचल्या पाहिजेत. मी स्वतः या कार्यालयात येऊन पक्ष संघटना वाढविण्यासाठी वेळ देणार आहे, असे मंत्री रवींद्र चव्हाण म्हणाले.

भाजप दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील यांनी म्हटले की, भाजपचे कार्यालय म्हणजे मंदिर आहे याचे भान राखायला हवे. पक्षाच्या कार्यालयातून सर्वसामान्यांचे प्रश्न सुटले पाहिजेत. सार्वजनिक समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जनतेला या कार्यालयाची उपयुक्तता कळायला हवी आणि हे कार्यालय सर्वसामान्यांचे आश्रयस्थान झाले पाहिजे.

ज्येष्ठ नेते सतीश धारप यांनी, हे कार्यालय रायगड जिल्ह्यातील भाजप कार्यकर्त्यांसाठी आधार ठरणार आहे. कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी मंत्री रवींद्र चव्हाण यांनी दोन महिन्यातून एकदा या कार्यालयात यावे तसेच खासदार व आमदारांनी महिन्याचा दिवस ठरवून या कार्यालयात यायला हवे, असे प्रास्ताविकात म्हटले. सतीश पाटील यांनी सूत्रसंचालन व आभार व्यक्त केले.

## विविध प्रकल्पांमुळे पुढच्या पिढीला पनवेलमध्येच रोजगार मिळणार -आमदार प्रशांत ठाकूर

महाविकास आघाडीमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हात बांधले होते. त्यामुळे बाळासाहेब ठाकरे यांनी ज्या तडफेने काम केले ती तडफ कायम राहण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांनी भाजपसोबत सरकारमध्ये येण्याचा निर्णय घेतला असल्याचे नमूद करून आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, सरकारच्या योजना सर्वांना मिळाल्याच पाहिजे यासाठी आपण नेहमी आग्रही राहिलो आहोत. पुढील काळातही त्याची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांचा विचार करणारे सरकार अर्थात महायुतीचे सरकार असणे गरजेचे आहे. यासाठी सर्व नागरिकांची साथ मला ताकद देणार असून तुमचा लोकप्रतिनिधी म्हणून मी कायम तुमच्या पाठीशी ठामपणे उभा राहीन, असा विश्वास या बैठकीच्या अनुषंगाने त्यांनी पनवेलच्या जनतेला दिला.

लाडकी बहीण योजना, अन्नपूर्णा, मुलींना मोफत उच्च शिक्षण, एसटी प्रवासात सवलत, पंतप्रधान आवास योजना, महात्मा फुले आरोग्य योजना, पीएम किसान योजना अशा विविध लोकहिताच्या योजना राबवतानाच विमानतळ, अटल सेतू, मेट्रो, पायाभूत सुविधा देण्याचे काम केंद्र व राज्य सरकारने केले आहे. राज्याच्या विकासाचा आलेख चढत्या क्रमाने राहण्यासाठी महायुतीचे सरकार पुन्हा येणे गरजेचे आहे, असे सांगतानाच पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात आपला देश एक शक्ती झाल्याचे जग मानते आहे. राज्यातही महायुतीचे सरकार पूर्ण ताकदीने कार्यरत आहे. लाडकी बहीण योजनेचा लाभ राज्यातील दोन कोटींहून अधिक बहिणींना झाला आहे. ही योजना बंद करण्यासाठी काँग्रेस कोर्टात गेली होती, तर शिवसेना उबाठा आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार हे पक्ष योजना बंद करणार असल्याचे स्पष्ट बोलत होते. आता मात्र निवडणूक जाहीर होताच त्यांनी नेहमीप्रमाणे घुमजाव केले आहे, मात्र त्यांच्यावर विश्वास ठेवून चालणार नाही, कारण ही योजना बंद करण्यासाठी महाविकास आघाडीकडून प्रयत्नांची पराकाष्टा झाली, परंतु मार्च २०२५पर्यंत या योजनेच्या आर्थिक निधीची तरतूद महायुती सरकारने आधीच केलेली आहे. त्यामुळे बहिणींनी चिंता करण्याची गरज नाही. आता या योजनेत आर्थिक वृद्धी केली जाणार आहे. तुम्हाला सर्व योजना मिळवून देण्यासाठी मी कटिबद्ध आहे, असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

रिक्षाचालकांच्या हितासाठी राज्य सरकारने महामंडळाची स्थापना केली आहे. त्या अनुषंगाने निवृत्तीनंतर चालकांना आर्थिक मदत आणि सुविधा मिळाल्या पाहिजेत यासाठी महायुती सरकार प्रयत्नशील असून त्या तुमचे प्रश्न सोडविण्यासाठी मी तत्पर आहे. पनवेलमध्ये विकास करण्याची ताकद केंद्र व राज्य सरकार आणि सर्व नागरिकांनी दिली आहे. यापुढेही ताकद माझ्या पाठीशी ठेवा, असे आवाहनही त्यांनी या वेळी तमाम जनेतला केले.

# तुलाडदेवी व भाटगल्ली ग्रामस्थांचा आमदार महेंद्र दळवी यांना पाठिंबा

## चौलमध्ये महायुतीचा धडाका; महिलाही सरसावल्या

**रेवदंडा : प्रतिनिधी**

तुलाडदेवी धावीरगल्ली व भाटगल्ली ग्रामस्थ व महिलांनी ऐन विधानसभा निवडणुकपुर्व महायुतीचे उमेदवार आमदार महेंद्र दळवी यांना पांठिबा जाहीर केला.



या वेळी धावीर मंदिरानजीक नवीन इलेक्ट्रिक ट्रान्सफार्मर बसविण्याचा कामाचे भुमिपुजन जि.प. माजी सदस्या मानसीताई दळवी यांचे हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. चौल तुलाडदेवी येथील धावीर मंदिर परिसरातील तुलाडदेवी व भाटगल्ली येथील शेतकरीवर्गाचा विद्युत कमी दाबाने पाणीपुरवठा फारच कमी प्रमाणात होत असे. याबाबत येथील शेतकरी बंधूनी कल्पेश नाईक व अमित राऊत यांच्या प्रयत्नाने नवीन इलेक्ट्रिक ट्रान्सफार्मरबसविण्यात येत आहे. त्या कामाचे भूमिपूजन जि.प. माजी सदस्या मानसीताई दळवी यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. तत्पुर्वी जि.प. माजी सदस्या मानसीताई दळवी यांनी येथील धावीर मंदिरात देवदर्शन घेतले. या वेळी तुलाडदेवी धावीर गल्ली व भाटगल्ली ग्रामस्थ व महिला यांची मोठया संखेने उपस्थित होते.

या वेळी रा.कॉं.चे पदाधिकारी प्रवीण राऊत, माजी पं.स.सदस्या प्रतिक्षा राउत यांचेसह कल्पेश नाईक, अमित राउत, तुलाडदेवी शाखा प्रमुख प्राजक्ता नितीन राउत, उपशाखा प्रमुख शीतल अमित राउत, चौल शाखाप्रमुख ज्योती शैलेश मुंबईकर तसेच अशोक गुरव, हर्षल घरत, शुभम राऊत, नितिन राउत, सुभाष राऊत, सिध्देश शेणवईकर, निखिल राउत, आदीची उपस्थिती होती.

या वेळी तुलाडदेवी धावीर गल्ली व भाटगल्ली ग्रामस्थ व महिला यांनी अलिबाग मुरूड विधानसभेचे महायुतीचे उमेदवार आमदार महेंद्र दळवी यांना जाहीर पांठिबा व्यक्त केला.

# माजी सैनिकांचा महायुतीचे आमदार महेंद्र थोरवेंना पाठिंबा



**खोपोली : प्रतिनिधी**

माजी सैनिकांनी आमदार महेंद्र थोरवे यांची भेट घेऊन त्यांना सक्रिय पाठिंबा असल्याचे लेखी पत्र दिले.

सैनिक फेडरेशन, सैनिक मित्र संघटना, सैनिक श्रमिक संघटना आणि एक्स सर्विसमेन लिगचे प्रमुख पदाधिकारी कर्नल चंद्रशेखर रानडे, युद्धवीर प्रकाश महाडिक, सुभेदार उपाध्याय सर, हवालदार येडमकर तसेच शरद विचारे इत्यादी पदाधिकाऱ्यांनी कर्जत-खालापूर विधानसभा मतदारसंघातील शिवसेना भाजप महायुतीचे उमेदवार आमदार महेंद्र थोरवे यांचे पोसरी कर्जत निवासस्थानी त्यांची भेट घेऊन माजी सैनिकांचे त्यांना सक्रिय समर्थन असल्याचे पत्र देऊन विजयासाठी शुभेच्छा दिल्या.

# मुरूडमध्ये खासदार सुनील तटकरेंची आज जाहीर सभा

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहरातील जैन वाडीमध्ये रविवारी (दि.१०) सायंकाळी ६ वाजता रायगडचे खासदार व पेट्रोलियम व नॅचरल गॅस पार्लमेंटरी कमिटीचे चेअरमन सुनील तटकरे यांची जाहीर सभा होणार आहे. अलिबाग-मुरूड विधानसभा क्षेत्राचे आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रचारासाठी या खास सभेचे आयोजन करण्यात आले आहे.



भारतीय जनता पक्ष, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस सरकारच्या काळात केली गेलेली विकास कामे त्याचप्रमाणे जनतेच्या हितासाठी राबवण्यात आलेल्या लोकहितकारी योजना याचा सारासार मांडतानाच विरोधकांना चोख उत्तर सुनील तटकरे देणार आहेत. खासदार सुनील तटकरे यांची आकर्षक भाषण शैली, क्रमाक्रमाने मांडले जाणारे मुद्दे, १९८० पासूनच राजकारणाचा इतिहास, विधानसभा अस्तित्वात आल्यापासून घडलेल्या राजकीय घडामोडी अगदी आकर्षक सादरीकरण करून जनतेची मने आकृष्ठ करण्याची कला व तंत्र त्यांना चांगले ठाऊक असल्याने तटकरे यांच्या सभेला प्रचंड गर्दी होत असते. या विशेष सभेकडे जनतेचे लक्ष वेधले असून रविवारची ही सभा वादळी व प्रचंड जनसमुदाय यांच्या साक्षीने आमदार महेंद्र दळवी यांच्या विजयाची मोहर उठवणारी ठरणार आहे.

जाहीर सभा संपताच खासदार तटकरे यांची विशेष पत्रकार परिषदसुद्धा होणार आहे. या सभेसाठी विशेष बैठक व्यवस्थेबरोबर विशेष पोलीस बंदोबस्तसुद्धा तैनात करण्यात आला आहे.

## निवडक

### बिभत्स वर्तनप्रकरणी गुन्हा दाखल

**पनवेल :** सार्वजनिक ठिकाणी अश्लील हावभाव करून बिभत्स वर्तन केल्याप्रकरणी तृतीयपंथीविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ६ नोव्हेंबर रोजी स्टील मार्केट रोडवर, मारुती चेंबर सेथे रात्री साडेआठच्या सुमारास एक तृतीयपंथी व्यक्ती अश्लील हावभाव करून नागरिकांचे लक्ष वेधून घेत होता. त्यावेळी पोलिसांनी या तृतीयपंथीयास ताब्यात घेतले. त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

### खारघरमधून एक जण बेपत्ता



**पनवेल :** राहत्या घरातून कचरा टाकण्यासाठी बाहेर गेलेला व्यक्ती अद्याप घरी न परतल्याने तो हरविल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे. सागर धनंजय पाटील (२९, रा.खारघर) असे या व्यक्तीचे नाव असून उंची पाच फुट, रंग सावळा, केस काळे बारीक, तोंडाजवळ बारीक मिशी, बांधा जाडसर, नाक सरळ, चेहरा गोलसर, डोक्यावर उजव्या बाजूस व कानामागे व पोटावर ऑपरेशनचे दोन व्रण आहेत. डोळ्याने कमी दिसते. तसेच वागणे हे गतीमंद व्यक्तीसारखे आहे. अंगात निळी बनियान व काळा बरमुडा आहे. त्याला हिंदी, मराठी भाषा बोलता येते. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी खारघर पोलीस ठाणे किंवा पोलीस नाईक जी.डी. आव्हाड यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### महिलेचे दागिने खेचून चोर पसार

**पनवेल :** मोटरसायकलवरून आलेल्या व्यक्तींनी ५२ वर्षीय महिलेच्या गळ्यातील २० ग्राम वजनाची सोन्याची चैन आणि माळ जबरीने खेचून नेली. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. संध्या मेहेत्रे ह्या लॅबोरेटरीमध्ये डायबिटीस ची तपासणी करण्यासाठी गेल्या होत्या. त्या पायी चालत सीकेटी कॉलेज सेक्टर ११, खांदा कॉलनी येथे गेल्या. सीकेटीकडे जाणाऱ्या रस्त्यावर बालग्राम महाराष्ट्र, सेक्टर १२, खांदा कॉलनी या संस्थेच्या इमारती समोरून चालत जात असताना दोन अनोळखी व्यक्ती काळ्या मोटरसायकल वरून पाठीमागून आले आणि त्यांनी संध्या यांच्या गळ्यातील सोन्याची चैन आणि सोन्याची माळ जबरीने खेचून ते पळून गेले.

### घोटगाव येथे लॅपटॉपची चोरी

**पनवेल :** घरामध्ये प्रवेश करून घरातील लॅपटॉप चोरी केल्याप्रकरणी चोराविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अनिल शिवराम पाटील हे घोटगाव येथे राहत असून रोजी ते घरातील बेडरूममध्ये झोपले होते. सकाळी उठल्यानंतर त्यांना लॅपटॉप दिसून आला नाही. अनोळखी व्यक्तीने घरात प्रवेश करून टीव्हीच्या टेबल जवळ ठेवलेला लॅपटॉप चोरून नेला.

### ‘मविआ’च्या लीना गरड यांचा प्रचार

**पनवेल :** महाविकास आघाडीच्या उमेदवार लीना अर्जुन गरड यांच्या प्रचाराची कळंबोली शहरातील सुरुवात काळभैरव मंदिर कळंबोली येथे शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या हस्ते नारळ वाढवून करण्यात आली तसेच कळंबोली शहरात प्रचार पत्रक वाटप करण्यात आली. या वेळी जिल्हा समन्वयक व निरीक्षक अनिल चव्हाण, उपजिल्हा प्रमुख भरत पाटील, विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर, महानगर समन्वयक दिपक घरत, उपमहानगर प्रमुख आत्माराम गावंड, शहर प्रमुख सुर्यकांत म्हासकर, युवासेना सहसचिव अवचित राउत आदी उपस्थित होते.



# विकासकामांचा रेकॉर्ड बघून मत द्या –आमदार प्रशांत ठाकूर

## खारघरमध्ये बाईक रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद





**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघरच्या विकासासाठी भाजप महायुतीच काम करत आहे, हा विश्वास आपल्याला लोकांच्या घराघरापर्यंत पोहचून द्यायचा आहे. काही जण हे निवडणुकीपुरते खोट-नाट पसरवून आम्ही काय केल हे सांगायला येथील मात्र त्यांचा पाच वर्षांपूर्वीचा रेकॉर्ड बघा आणि त्याच आधारावर मतदान द्या, असे सर्वांना सांगा हे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघरमध्ये बाईक रॅलीवेळी केले.

पनवेलला विकासाच्या दिशेने वेगाने नेणारे आमदार प्रशांत ठाकूर याचा जोरदार प्रचार संपुर्ण मतदार संघात सुरू आहे. त्यांच्या प्रचारार्थ खारघरमध्ये भव्य बाईक रॅलीचे आयोजन शुक्रवारी करण्यात आले होते. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या भव्य प्रचार रॅलीत जनतेचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. या रॅलीत तरुणांचा उत्साह उर्जादायक होता. या बाईकी रॅलीचा शुभारंभ खारघर सेक्टर २१मध्ये झाला असून सेक्टर ६ मध्ये सांगता झाली.

या दरम्यान जनतेने आमदार प्रशांत ठाकूर यांना विजयाचा आशीर्वाद दिला. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, किर्ती नवघरे, खारघर शहर अध्यक्ष प्रविण पाटील, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, हर्षदा उपाध्याय, आरती नवघरे, माजी नगरसेवक निलेश बावीस्कर, नरेश ठाकूर, शत्रृघ्न काकडे, शिवसेना अध्यक्ष प्रसाद परब, भाजपचे मंडल सरचिटणीस दीपक शिंदे, महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस संध्या शारबिद्रे, खारघर शहर अध्यक्षा साधना पवार, किरण पाटील, अमर उपाध्याय, युवमोर्चा शहर अध्यक्ष नितेश पाटील, जिल्हा चिटणीस शुभ पाटील, केतन नवघरे, विजय पाटील, संतोष शर्मा, अमर उपाध्याय, राष्ट्रवादीच्या प्रज्ञा भुमरे, श्यामला सुरेश, मधुमिता जेना, भाग्यश्री खरपुरिया, गायत्री दुबे, जुमा चकवर्ती, विपुल चौटालिया, कुणाल संघानी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पनवेल परिसरातून सव्वा नऊ लाखांची रोकड जप्त

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल विधानसभा मतदारसंघ निवडणूक विभाग अंतर्गत संशयास्पद वाटणाऱ्या गाड्यांची तपासणी करण्यात येत आहे. यामध्ये पनवेल परिसरातून नऊ लाख ३७ हजारांची रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.

पहिल्या घटनेत पनवेल बावन बंगलाकडून कामोठेकडे जाणाऱ्या दुचाकीची तपासणी केली. यात पाच लाख ८५ हजाराची रोख रक्कम आढळून आली. ही रक्कम पुढील कार्यवाहीसाठी भरारी पथक (एफएसटी) क्र.०३ यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.

दुसऱ्या घटनेत आचारसंहिता पथकांतर्गत वायूवेग पथक क्र. ३ मोटार वाहन निरीक्षक दिलिप दराडे यांनी खारघरकडून कळंबोलीकडे जाणारी एक चार चाकी अडवून तपासणी केली असता, त्यामध्ये दोन लाखांची रोख रक्कम आढळून आली. ही रक्कम जप्त करण्यात आली.

तिसऱ्या घटनेत आचारसंहिता पथकांतर्गत स्थिरसर्वेक्षण पथक क्र.०८ (एसएसटी-०८)ने शेडुंग चेक नाका येथे रोडवरून जाणारी एक चार चाकी गाडी थांबवून तपासणी केली असता त्यामध्ये एक लाख ९२ हजार २० रुपयांची रोख रक्कम आढळून आली.पथकाने ती रक्कम जप्त केली आहे. कारवाई १८८ पनवेल विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी पवन चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## स्टेशन परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** बेलापूर रेल्वे स्टेशन फलाट क्र.२ च्या परिसरातील एका ट्रकमध्ये एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल रेल्वे पोलीस करीत आहेत.

मयत व्यक्तीचे अंदाजे वय ३० वर्षे, उंची पाच फूट पाच इंच, अंगाने सडपातळ, रंग काळा सावळा, डोक्याचे केस बरीक काळे, दात शाबू, डोळे काळे पांढरे, नाक सरळ, चेहरा उभट, दाढी मिशी वाढलेली आहे. अंगात पिवळा हाफ बाह्याचा टी शर्ट, फिकट हिरवी ट्रॅक पॅन्ट आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक शिवाजी भोसले (९८२३०८०२९२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नाने पनवेल कोर्टाच्या इमारतीवर नवीन मजले

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेलच्या नवीन कोर्ट इमारतीवर दोन मजले व जुन्या कोर्टाच्या जागी नवीन कोर्ट बांधणेकरिता आर्थिक तरतुद करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वतः जातीने लक्ष दिल्यामुळेच दोन मजल्यांच्या बांधकामाची प्रलंबीत मागणी महाराष्ट्र शासनाच्या हाय पॉवर कमिटी (HPC)ने मान्य केली आहे. त्यामुळे कोर्टाच्या इमारतीवर दोन नवीन मजले होणार आहेत. त्याबद्दल पनवेल बार कौन्सिलचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ यांनी त्यांचे आभार मानले.

पनवेल, उरण, कर्जत, खालापूर, येथील दिवाणी व फौजदारी स्वरूपाचे कामकाज पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर आणि जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय पनवेल येथे चालत असून पनवेल येथे दिवाणी व फौजदारी कामाची प्रलंबित संख्या अंदाजे ४५ हजाराच्यावर आहे. या कामकाजाकरिता पनवेल येथील नवीन इमारतीमध्ये सह दिवाणी न्यायालय



व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अशी सहा न्यायालये आहेत तसेच दिवाणी न्यायाधिश वरिष्ठस्तर चार आणि जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय चार आहेत. तसेच पोस्को न्यायालय एक असे एकूण १५ न्यायालये आहेत, परंतु नवीन कोर्टामध्ये तळमजला अधिक एक मजला असे एकूण प्रत्यक्षात आठ कक्ष असून त्यामध्ये सध्यस्थितीत दाटीवाटीने १५ न्यायालये चालवत आहेत, परंतु त्यापैकी सात न्यायालयांना रितसर न्यायलयीन कक्ष नाही.

याकरिता या नवीन इमारतीमध्ये असलेली वकीलांची लायब्ररी तसेच कँटिनमध्ये आणि सिव्हील प्रिझोनमध्ये बसण्याची तात्पुर्ती व्यवस्था केलेली आहे. अशा प्रकारे सदर इमारती मध्ये १५ न्यायालये चालू आहेत. पनवेल येथील प्रलंबित कामांच्या प्रमाणात जागा उपलब्ध नल्यामुळे कामकाजात अडचण निर्माण होते. त्याकरिता शासनाकडून नवीन दोन वाढीव मजले बांधणेकरिता लवकरात लवकर आर्थिक तरतुद मिळावी या करिता पनवेल बार कौन्सिलचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना निवेदन दिले होते.

> **पनवेल येथील नवीन कोर्ट इमारतीतवर आणखी दोन मजल्यांच्या बांधकामाची परवानगी मिळाल्याने अनेक नवीन कोर्ट पनवेल येथे कार्यान्वित होऊन न्यायदान प्रक्रिया सुसह्य होईल. पक्षकार, वकील, संबंधीत यंत्रणा यांचा वेळ, श्रम, पैसे इत्यादी सर्व बाबींची बचत होणार आहे.**
> **-ॲड. मनोज भुजबळ, अध्यक्ष, पनवेल बार कौन्सिल**

यामध्ये पनवेल येथील ब्रिटीश कालीन जुनी कोर्ट इमारत ज्या मिळकतीवर उभी आहे ती जागा भव्य असून जागेवर नव्याने इमारत बांधुन तेथे कोर्ट चालविणे आवश्यक आहे. त्याकरिता आर्थिक तरतुदी होणे गरजेचे आहे. जर जुन्या इमारतीवर नवीन इमारत उभी राहील्यास पनवेल जिल्हा न्यायालयाच्या अखत्यारित येणाऱ्या सर्व तालुक्यातील पक्षकार व वकीलांना न्याय मिळेल.

सर्व वस्तुस्थितीचा विचार करून पनवेल येथील नवीन इमारतीवर दोन मजले बांधणेकरिता तसेच जुन्या कोर्ट इमारतीवर नवीन इमारत बांधण्याकरिता आर्थिक तरतुदीची शिफारस करावी, अशी विनंती करण्यात आली होती. या कामाला आमदार प्रशांत ठाकूर यांचे पाठपुराव्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या हाय पॉवर कमिटी (HPC)ने मान्यता दिली आहे.

## कारचालकाला लुटले; गुन्हा दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कार चालकाला चाकूचा धाक दाखवून आणि मारहाण करून खिशातील नऊ हजार रुपये आणि दोन मोबाईल जबरदस्तीने काढून केल्याप्रकरणी तीन अनोळखी व्यक्तींविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

२५ ऑक्टोबर रोजी शहबाज खान हा पलावा सिटी डोंबिवली येथे असताना त्याला पनवेल येथील भाडे आले. त्याच्या स्विफ्ट डिझायर कारमध्ये तिघेजण बसले. मुंब्रा पनवेल रोडने जात असताना गजेबो ढाब्याचा पुढे पाठीमागे बसलेल्या एकाने शहाबाजने लावलेल्या सीट बेल्टने त्याचा गळा आवळला आणि गाडी बाजूला घेण्यास सांगितली. या वेळी बाजूला बसलेल्या व्यक्तीने चाकू काढून जे पैसे, मोबाईल आहेत ते काढ नाहीतर तुला मारेन असे बोलून शिवीगाळ केली आणि ठोशा बुक्क्यांनी मारहाण केली.

या वेळी त्यांनी खिशातील नऊ हजार रुपये, आयफोन आणि ओप्पो कंपनीचा मोबाईल जबरदस्तीने काढून घेतला. ते तिघेजण खाली उतरले आणि मुंब्रा दिशेने निघून गेले. त्यानंतर शहाबाज गावी उत्तर प्रदेश येथे गेला. या प्रकरणी ७ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते रायगड शिव सम्राट दिवाळी अंक प्रकाशन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड शिव सम्राट दिवाळी अंकाचे प्रकाशन लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रकाशनावेळी रायगड शिव सम्राट वृत्तपत्राचे संपादक रत्नाकर पाटील, पनवेल राजचे संपादक सुभाष वाघपंजे, शिवतेज मित्र मंडळाचे ज्येष्ठ सदस्य शशिधर माळी उपस्थित होते.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, हा दिवाळी अंक आरोग्यविषयक माहितीवर आधारित आहे. दिवाळी अंकाची मांडणी अत्यंत रचनात्मक आहे.

## दीपक करंजीकरांचे व्याख्यान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंदु जगेगा तो राष्ट्र जगेगा असे घडत असलेली ही एकमेव आपली भूमी आहे, जी विखंडीत झाली पण नष्ट झाली नाही, असे मत पनवेलमध्ये आयोजित व्याख्यान कार्यक्रमात दीपक करंजीकर यांनी मांडले.

श्री विरुपाक्ष महादेव मंदिर ट्रस्टच्या वतीने हिंदू जगे तो विश्व जगेगा या विषयावर दीपक करंजीकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम पनवेल शहरातील गोखले हॉलमध्ये शुक्रवारी (दि.८) झाला.

या कार्यक्रमाला पनवेलकरांचा चांगला प्रतिसाद लाभला. व्याख्यानाला श्री विरुपाक्ष महादेव मंदिर ट्रस्टचे सचिव गुरुनाथ लोंढे, ‘सजग रहो’चे सदस्य राकेश पाठक आदी उपस्थित होते.



## आमदार महेश बालदी यांचा प्रचार

### कार्य अहवाल पुस्तिकेचे वाटप

**उरण : वार्ताहर**

उरण विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार महेश बालदी यांचा प्रचार सुरू आहे. उरण शहरातील भाजप कार्यकर्त्यांनी महेश बालदी पाच वर्षे आमदार असताना केलेल्या विकासाची कामे, कार्य अहवाल पुस्तिका वाटपाचे काम भाजप कार्यकर्ते करीत आहेत.

उरण शहरातील कामठा, पालवी हॉस्पिटल परिसर, बाजार पेठ, लाल मैदान, जरीमरी मंदिर आदी ठिकाणी मतदारांना, कार्य अहवाल पुस्तिका वाटपाचे काम सुरू केले आहे.



या वेळी माजी नगरसेवक तथा उरण शहर भाजप अध्यक्ष कौशिक शाह, माजी नगरसेवक राजेश ठाकूर, माजी नगरसेविका प्रियांका पाटील, नेहा बालदी, राधिका बालदी, हितेश शाह, अजित भिंडे, हस्तीमल मेहता, निधी शर्मा, जितु पटेल, विनोद रूपचंदानी, संतोष ओटावकर, जगदीश पाटील, मकरंद पोतदार, पूजा ओटावकर, हर्षीद पटेल, वेदांत झावरे, अंकित गुप्ता, नीता पडते, गणेश गुरव, रोहित पाटील, भाद्रेश रावल, सुहास फराड आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



**उरण : पिरकोन गावात भाजप महिला सदस्य बिंदू मुकुंद गावंड यांच्या घरी आमदार महेश बालदी यांचा निवडणूक प्रचाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी नीता बालदी, भाजप महिला मोर्चा तालुका अध्यक्ष राणी म्हात्रे, नेहा बालदी, बिंदू गावंड आदी महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.**

**पनवेल : महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विजयासाठी चिंध्रण पंचायत समिती विभागात प्रचार दौरा कारण्यात आला. या वेळी भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, एकनाथ देशेकर, शिवाजी दुर्गे, आनंद ढवळे, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष कमला देशेकर, माजी पं.स.सदस्य रत्नप्रभा घरत, कल्पना ठाकूर, नरेश पाटील, धनंजय पाटील, प्रकाश खैरे आदी उपस्थित होते.**



# ‘चुरा लिए है तुमने जो दिल को...’

## आशा भोसले यांचा कायमच तरुण असलेला गीत फंडा

झूम प्रहर
दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक



तुला चार दशकातील सिनेपत्रकारितेने काय दिले असा प्रश्न अधूनमधून कोणी मला करत असतोच. त्यावर मी म्हणतो, अनेक सकारात्मक गोष्टी आवर्जून सांगता येतील. त्यात एक आहे, अनेक नामवंतांच्या लहान मोठ्या असंख्य भेटीगाठी आणि त्यात एक उल्लेखनीय नाव, आशा भोसले यांची भेट.

साधारण सतरा वर्षांपूर्वी पेडर रोडवरील प्रभू कुंज येथे आपल्या एका कार्यक्रमाबाबत माहिती देण्यासाठी मुंबईतील आम्हा काही सिनेपत्रकारांना आमंत्रित केले असता आशा भोसले यांच्या भेटीचा योग आला... आणि असा काही सुखावलो. गतवर्षीदेखील त्यांच्या वाढदिवसानिमित्त दुबईत आयोजित करण्यात आलेल्या आशा भोसले यांच्या गाण्याच्या कार्यक्रमाची माहिती करून देण्याच्या पत्रकार परिषदेत त्यांना आवर्जून मी एक प्रश्न केला (यू ट्यूबवर ही पत्रकार परिषद उपलब्ध आहे.)

आज हे सांगण्यामागचे कारण काय?

*चुरा लिया है तुमने जो दिल को*
*नजर नहीं चुराना सनम*
*बदल के मेरी तुम जिंदगानी*
कहीं बदल न जाना सनम

या कायमच तारुण्यात असलेल्या गाण्याचे वय एकावन्न झाले आहे. तरीही ते गाणे वीस वा पंचविशीतच आहे. आशा भोसले यांचे स्वतःचे एक हे आवडते गाणे. काहींच्या डोळ्यासमोर नासिर हुसेन निर्मित व दिग्दर्शित 'यादों की बारात' (मुंबईत रिलीज ९ नोव्हेंबर १९७३. एकावन्न वर्ष पूर्ण झालीदेखील)मधील झीनत अमान, विजय अरोरा, गिटार आणि दोन ग्लास एकमेकांवर हळूवार वाजवली जातात असा अख्खा 'सीन' आला असेल. काय भारी गाणे आहे हो. काही गाण्यांना वय नसते. काळाची मर्यादा नसते. चित्रपट पडद्यावरून उतरतो. रिळे गोडाऊनमध्ये जातात. चित्रपट मागे पडतो. फ्लॅशबॅक सदरात जमा होतो, पण काही गाणी मात्र रसिक श्रोत्यांची पिढी बदलली, गाणे ऐकण्याच्या (रेडिओ ते डिजिटल), पाहण्याच्या (चित्रपटगृहाच्या पडद्यावर यापासून ते हातातील मोबाईलवर, ओटीटीवर) पद्धती बदलल्या तरी ती 'तरुण'च राहतात. ही किमया गीतकार, संगीतकार व पार्श्वगायकाची असते.

काही गाण्यांना वय नसते. ती देव आनंदप्रमाणे सदैव चैतन्यमय असतात ती कधीच जुनी होत नाहीत (तरी 'मला जुनी गाणी फार आवडतात' असं का बरे म्हणतात?) कितीदाही ऐकली, आठवली, गुणगुणली, पाहिली तरी कायमच तारुण्यात असतात. चुरा लिया... अगदी तस्सेच.

आजच्या सोशल मीडियात तुमच्याही पाहण्यात एक व्हिडीओ आला असेल, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत आशा भोसले 'चुरा लिया...'चा अंतरा गायल्या. तेव्हाही आशा भोसले एक्याण्णव वयाच्या वाटत नाहीत (त्यांनाही वय ही गोष्ट लागू होत नाही) आणि उपस्थितही या वेळी ठेका धरतात. स्त्री शक्ती सन्मान पुरस्कार सोहळ्यातील तो क्षण आहे. या गाण्यासाठी 'यादों की बारात'च्या इपी/एलपी/थर्टी थ्री तबकड्या रेकॉर्ड ब्रेक विकल्या गेल्या, इराणी हॉटेलमधील ज्यूक बॉक्समध्ये वन्स मोअर आठ आण्याचे नाणे टाकले गेले यात काहीच आश्चर्य नाही. चित्रपटाची गीते मजरुह सुल्तानपुरी यांची असून संगीत राहुल देव बर्मनचे आहे. हे गाणे आशा भोसले व मोहम्मद रफी यांनी गायलंय. तरी आशा भोसले यांच्यासाठी ते जास्त ओळखले जाते. काय भारी गायलंय नि काय पिक्चरराइझेन झालंय. ज्याला वेल पॅकेज म्हणतात ते असेच गाणे असते.

गाण्याची सिच्युएशन, त्याचा मुखडा, त्याचे प्रेझेंटेशन, गाण्याची सुरुवात, त्याचा अंतरा, एका छोट्याशा पार्टीतील हळूवार प्रेमाची कबूली, आजूबाजूचे सगळेच हे गाणे ऐकताहेत; मोहक मादक आकर्षक झीनत अमान, 'सभ्य रूपातील' विजय अरोरा, दोघांची नजरानजर, खाणाखुणा, भावमुद्रा, गिटारवादन, गाण्याची वाढती रंगत. या गाण्यासाठी नाझ चित्रपटगृहात मी हा चित्रपट सात आठ वेळा वेगवेळ्या अॅन्गलमधून पाहिला. कधी दोन रुपये वीस पैशात स्टॉलचा पब्लिक म्हणून, तर कधी तीन रुपये तीस पैशात अप्पर स्टॉलचा पब्लिक म्हणून पाहिला. चार रुपये चाळीस पैशाचे बाल्कनीचे तिकीट फार महाग वाटे. ही त्या काळातील मध्यमवर्गीयांची मानसिकता. पिक्चरने पन्नास आठवड्यांचा मुक्काम केला.


आशा भोसले आणि राहुल देव बर्मन यांनी कायमच टॉपचा परफॉम दिला. कधी जोडीला मोहम्मद रफी अथवा किशोरकुमार. ओ मेरे सोना रे, आजा आजा मै हू प्यार तेरा, ओ हसिना जुल्फो वाली जाने जहा (तिसरी मंझिल), पिया तू अब तो आ जा (कारवा), दम मारो दम (हरे राम हरे कृष्ण), ये वादा रहा (यह वादा रहा), दुनिया मे लोगों को (अपना देश) यापासून कत्रा कत्रा, मेरा कुछ सामान (इजाजत) पर्यंत केवढी तरी लोकप्रिय गाणी आहेत. त्यात चुरा लिया... एकदम हटके नि सुपर. तरुण व टवटवीत.

आशाजींनी झीनत अमानचा मूर्तिमंत मधाळपणा आपल्या गायनात परफेक्ट पकडला. जणू झीनत गातेय असं वाटतं. 'दम मारो दम'पासूनचे ते हिट्ट व फिट्ट समीकरण. ते शम्मी कपूर दिग्दर्शित 'मनोरंजन' (१९७४)मध्ये चोरी चोरी सोला सिंगार करूंगी या गाण्यातही छान जमून आलंय. आपण कोणत्या अभिनेत्रीसाठी पार्श्वगायन करतोय हे आशा भोसले नेहमीच जाणून घेत गात आणि गाणे आणखी खुललं जाई. झीनत अमान अभिनयासाठी कधीच ओळखली गेली नाही. अनेक गाण्यात मात्र ती मस्त खुलली, रमली. तिला चित्रपट गीत संगीतातील नक्कीच समजत होते हे अनेक चित्रपटांतील गाण्यात दिसले. या गाण्यात ते जास्त दिसले. मुळात ती मॉडेल आणि आपलं सेक्स अपील हेच आपलं चित्रपटसृष्टीसाठीचं भांडवल हे सत्य ती मनोजकुमार (रोटी कपडा और मकाम), राज कपूर (सत्यम शिवम सुंदरम), बी.आर. चोप्रा (इन्साफ का तराजू) या बड्या दिग्दर्शकांच्या चित्रपटातून भूमिका साकारताना ती विसरली नाही. विजय अरोराही अभिनयासाठी ओळखला गेला नाही. याच गाण्यामुळे तो रसिकांच्या पुढील पिढीतही माहीत झाला. एक हिट गाणे असं बरंच काही देत असते. ते एका काळातील चित्रपट पुढील पिढीत नेत असते. म्हणूनच चित्रपटात दर्जेदार गाणी हवीत. जी पूर्वी चित्रपती व्ही. शांताराम, राज कपूर, मेहबूब खान, गुरूदत्त, के.असिफ विजय आनंद यांच्या चित्रपटात हमखास असत.

निर्माता व दिग्दर्शक नासिर हुसेन हे मसालेदार मनोरंजक चित्रपटांचे हुकमी नाणं. 'स्टोरीपेक्षा गीत संगीत व नृत्य यातून पिक्चर खुलवणारे'. आपला पहिलाच चित्रपट 'तुमसा नहीं देखा' (१९५७) पासूनचे त्यांची ही खासियत. यू तो हमने लाखो हंसी देखी है, जवानी मस्त मस्त, देखो कसम से ही यातील गाणी आजही ऐकावीत/पहावीत. तीच रंगत. नासिर हुसेन यांनी आपल्या प्रत्येक चित्रपटाच्या प्रगती पुस्तकात गाण्यांवर मनसोक्त मनमुराद आनंद घेतला आणि कलाकारांकडून त्याच मोकळ्या ढाकळ्या मूडमध्ये करून घेत ती रसिकांसमोर आणली. दिल देखे देखो दिल देनेवालो दिल देना सिखो जी, बडे है दिल के काले (दिल देके देखो, १९५९), ये आंखे उफ यूं, सौ साल पहले मुझे तुमसे प्यार था, जिया ओ जिया कुछ बोल दो (जब प्यार किसीसे होता है, १९६१), बंदा परबर थांबलो जिगर, लाखों है यहा दिलवाले (फिर वोही दिल लाया हू. १९६३), चुनरी संभाल गोरी, आजा पिया तोसे प्यार दू (बहारों के सपने, १९६७), मै ना मिलूंगी, मी सुलताना रे, तुम बिन जाऊ कहा (प्यार का मौसम, १९६९), चढती जवानी मेरी चाल मस्तानी, दिलबर दिलसे प्यारे, गोरिया कहां तेरा देश रे, कितना प्यारा वादा (कारवा. १९७१)... नासिर हुसेन टच म्हणतात तो हाच. संगीताचा कान आणि डोळे असणारा फिल्मवाला. आणि मग 'यादों की बारात'. याचीही सगळीच गाणी लोकप्रिय. त्यानंतर नासिर हुसेन यांनी हम किसीसे कम नही (१९७७), जमाने को दिखाना हू (१९८१), मंझिल मंझिल (१९८४), जबरदस्त (१९८५) अशी वाटचाल करताना शेवटचे तीन पिक्चर फ्लॉप झाल्याने दिग्दर्शन संन्यास घेतला तरी गाण्यात कुचराई नाही. ती हिट. नासिर हुसेन व राहुल देव बर्मन जोडी 'बहारों के सपने'पासून जमली ती प्रत्येक चित्रपटात कायम राहिली. नासिर हुसेन निर्मित व विजय आनंद दिग्दर्शित 'तिसरी मंझिल' (१९६७) आर. डी. बर्मनच्या कारकिर्दीला मोठीच लिफ्ट देणारा.


'यादों की बारात'ची पटकथा व संवाद सलिम जावेदचे आहेत. पण पिक्चर नासिर हुसेनसाठीच आणि खास करून चुरा लिया... गाण्यासाठी आठवणीत आहे. येथे दिग्दर्शक दिसतोय. या पिक्चरच्या पोस्टर, होर्डिंग्ज, थिएटरमधील शो कार्ड्स असे सगळीकडे त्या दिवसात या गाण्यातील झीनत अमान व विजय अरोरा यांना स्थान. आणि ते दिसताच गाणे ओठावर व डोळ्यासमोर येई. गाण्याची लोकप्रियता अशीच भन्नाट व भरपूर हवी. पिक्चरमध्ये धर्मेंद्र, तारीक, इम्तियाज, शेट्टी, अजित यांच्याही भूमिका. लहानपणीच हरवलेले तीन भाऊ मोठेपणी सापडतात आणि एक भाऊ मां बाप के खून का बदला घेतो अशी स्टोरी. (यश चोप्रा दिग्दर्शित वक्त वरून यादों की बारात लिहिताना नैसर्गिक संकटाच्या जागी व्हीलनच्या कारवाया आल्या.)




















चुरा लिया...ची डिजिटल युगात अनेकदा विविध स्टाईल नि टोनमध्ये अनेकांनी रिमिक्स केली. मूळ गाण्याची सर येण्याची शक्यता नसतेच. आशाजींच्या देशविदेशातील जवळपास प्रत्येक इव्हेन्टसमध्ये त्या चुरा लिया... त्याच मूळ तरुणाईने व उत्साहात गातात. त्यात त्या स्वतः तल्लीन होतात आणि हाऊसफुल्ल क्राऊडलाही जणू वेड लावतात. गाणे आहेच तसं हो. ऐकताना, पाहताना वय विसरायला लावणारे. चला पुन्हा एकदा नजरेतून बोलणारी झीनत अमान, काहीसा ओशाळलेला विजय अरोरा आणि आशा भोसले व मोहम्मद रफींची एक्स्प्रेशन मेलडी पाहूया...

काळ बदलला, दिवस वेगाने पुढे सरकताहेत, नवनवीन माध्यमे येताहेत (येणार आहेत), काही गाणी मात्र या प्रवासात आपली साथ संगत करताहेत. आपल्या देशातील हिंदी व मराठीसह प्रादेशिक भाषेतील चित्रपट संस्कृतीचे विशेष म्हणजे गीत संगीत व नृत्य. त्याने अनेक रसिक पिढ्यांना भरभरुन आनंद दिला आहे, देत आहे आणि यापुढेही देत राहणार आहे. त्यातीलच एक चुरा लिया है, तुमने जो दिल को...

---

# मतदार आणि उमेदवारांकरिता विविध ॲप्लिकेशन्स

केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदार आणि उमेदवारांकरिता सी-व्हिजिल, सुविधा ॲप, फिडेविट पोर्टल, व्होटर टर्नआऊट ॲप, व्होटर हेल्पलाइन ॲप, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांकरिता सक्षम ॲप, केवायसी ॲप आणि १९५० क्रमांकाची हेल्पलाईन आदी आयटी ॲप्लिकेशन्सच्या माध्यमातून सुविधा दिल्या आहेत, त्यांची थोडक्यात माहिती...

### सी-व्हिजिल

सी-व्हिजिल हे ॲप हे आदर्श आचारसंहिता आणि खर्चाच्या उल्लंघनाची तक्रार करण्याकरिता एक अभिनव असे मोबाइल ॲप्लिकेशन आहे, ज्याद्वारे प्रत्येक नागरिकाला निवडणुकीच्या वेळी आपल्या स्मार्टफोनचा उपयोग करून छायाचित्रे, श्राव्य, किंवा दृक चित्रण अपलोड करता येते. 'सी-व्हिजिल'चा अर्थ 'सतर्क नागरिक' असा आहे. हे ॲप आता मराठी भाषेत, पण उपलब्ध आहे. या ॲपच्या माध्यमातून तक्रार दाखल झाल्यानंतर आचारसंहिता उल्लंघन झाल्याचे ठिकाण शोधण्यासाठी जीपीएसचा उपयोग करता येतो.तक्रारीच्या स्थितीचा मागोवा घेऊन १०० मिनिटांत स्थितीची माहिती देते.

सी-व्हिजिल ॲप डाउनलोड करण्यासाठी लिंक गुगल प्लेस्टोअरमध्ये https://play.google.com/store/apps/details?id=in.nic.eci.cvigil&hl=en_IN ॲपल स्टोअर https://apps.apple.com/in/app/cvigil/id १४५५७१९५४१वरही उपलब्ध आहे.

### सुविधा ॲप २.०

केंद्रीय निवडणूक आयोगाने सुविधा २.० हे मोबाईल ॲप अद्ययावत केले असून याद्वारे उमेदवार आणि पक्षांना आता कोणत्याही ठिकाणाहून सहजपणे निवडणूक मोहिमेच्या परवानग्या ऑनलाईन सुविधेद्वारे मिळणार आहे. सुविधा २.० हे मोबाईल ॲप वापरण्यास सहज आणि अधिक सुरक्षित आहे. या ॲपच्या खास वैशिष्ट्यांमध्ये उमेदवारांना अर्ज डाउनलोड करणे, प्रचारासंदर्भातील परवानग्या मागवणे, अर्ज केलेल्या परवानगीसंदर्भात सद्यस्थिती जाणून घेणे आणि मंजुरीची प्रत डाउनलोड करणे आदी बाबी समाविष्ट आहेत. त्याचबरोबर या ॲपमध्ये नामनिर्देशन प्रक्रिया, निवडणूक वेळापत्रक आणि निवडणूक आयोगाच्या ताज्या अद्ययावत सूचना व आदेश देखील उपलब्ध असतील.

गुगल प्ले स्टोअरवर https://play.google.com/store/apps/details?id=suvidha.eci.gov.in.candidateapppli=1 यावर आणि आयओएससाठी ॲपल ॲप स्टोरवर https://apps.apple.com/app/suvidha-candidate/id6449588487 या लिंकवर उपलब्ध आहे.

### फिडेविट पोर्टल

फिडेविट पोर्टल निवडणुकीसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांच्या नामनिर्देशनाची संपूर्ण यादी पाहता येते. कोणताही नागरिक फिडेविट पोर्टलचा उपयोग करून उमेदवाराचे प्रतिज्ञापत्र पाहू शकतो व डाउनलोड ही करू शकतो. नागरिकांच्या सुविधेसाठी नामांकन दाखल, स्वीकारले, नाकारले, मागे घेतले, उमेदवार स्पर्धेत आहे याची माहिती मिळते. पोर्टलची लिंक : https://affidavit.eci.gov.in

### व्होटर टर्नआऊट ॲप

व्होटर टर्नआऊट ॲप प्रत्येक राज्य, जिल्हा आणि मतदारसंघासाठी अंदाजित मतदानाच्या टक्केवारीची दर दोन तासांनी माहिती देते. हे ॲप्लिकेशन फक्त विधानसभा, लोकसभा आणि पोटनिवडणुकीच्या वेळी सक्रिय होते.

व्होटर टर्नआऊट ॲपमध्ये प्रत्येक राज्य, जिल्हा आणि मतदारसंघाची अंदाजित मतदान टक्केवारी दाखवते. भारत निवडणूक आयोगाच्या सर्व्हर वरून 'रिअल-टाइम' डेटाचा उपयोग करण्यात

(सी-व्हिजिल ॲप आता मराठीमध्येदेखील उपलब्ध)




येतो. निवडणूक प्रकार, राज्य, जिल्हा आणि मतदारसंघानुसार यामध्ये मतदानाच्या टक्केवारीची माहिती मिळते.एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील मतदानाचा अंदाज मिळवण्याचा हा एक जलद आणि सोपा असा पर्याय आहे

'व्होटर ट्रर्नआऊट ॲप डाउनलोड करण्यासाठी गुगल प्लेस्टोअरमध्ये https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.eci.pollturnouthl=enšIN Am आणि ॲपल स्टोअरवर https://apps.apple.com/in/app/voter-turnout-app/id1536366882 ही लिंक आहे.

### व्होटर हेल्पलाइन ॲप

मतदारांना आपले मतदार यादीत नाव आहे याची माहिती व्होटर हेल्पलाईन ॲपमध्ये मिळते. हे ॲप प्रत्येकासाठी अधिक सोयीस्कर आणि महत्त्वाचे आहेत. व्होटर हेल्पलाईन ॲपमध्ये मतदारयादीत नावाची शहानिशा करणे, नवीन मतदार नोंदणीसाठी ऑनलाइन अर्ज सादर करणे, दुसऱ्या मतदारसंघात स्थलांतरित करणे, परदेशात राहणारे मतदार, मतदारयादीतील नाव हटवणे किंवा आक्षेप घेणे, नोंदींची दुरूस्त करणे, तुमच्या क्षेत्रातील निवडणुकीचे वेळापत्रक शोधणे, सर्व उमेदवार त्यांचे प्रोफाइल, उत्पन्न विवरण, मालमत्ता, गुन्हेगारी प्रकरणे शोधणे, बीएलओ, ईआरओ, डीईओ आणि सीईओ यांची माहिती मिळवता येते व संपर्क साधता येतो

व्होटर हेल्पलाइन ॲप डाउनलोड करण्यासाठी लिंक गुगल प्लेस्टोअरमध्ये https://play.google.com/store/apps/details?id=com.eci.citizenhl=mrpli=1 ॲपल स्टोअरवर https://apps.apple.com/in/app/voter-helpline/id1456535004

### सक्षम ॲप

केंद्रीय निवडणूक आयोग दिव्यांग नागरिकांसाठी (पीडब्ल्यूडी) मतदार ओळख आणि नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्याकरिता हे ॲप विकसित केले आहे. या ॲपवर दिव्यांग व ज्येष्ठ मतदारांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

निवडणूकसंदर्भात सेवा घेण्याकरिता दिव्यांग व वयोवृद्ध मतदारांनी त्यांचे नाव, पत्ता व मोबाईल क्रमांक इ. माहिती ॲपमध्ये भरावी. दिव्यांग व वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिकांना या सक्षम ॲपद्वारे मतदानाच्या दिवशी मतदानासाठी लागणाऱ्या सहाय्यतेची मागणी नोंदविता येईल, त्याद्वारे मतदारसंघातील दिव्यांग आणि वयोवृद्ध मतदारांना त्यांच्या मतदानाचे मतदारसंघ व स्थान निश्चिती यंत्रणेला करणे शक्य होईल. या ॲपद्वारे नोंदणी झाल्यानंतर दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रापर्यंत ने-आण करण्यासाठी वाहतूक व्यवस्था, व्हीलचेअर, सहाय्यक, मदतनीस इ. प्रकारची सुविधा या ॲपच्या माध्यमातून मिळणार आहेत.

सक्षम ॲपमध्ये अनेक सुविधा प्रदान करण्यात आल्या आहेत. या ॲपमध्ये मोठे फॉन्ट आणि उच्च कॉन्ट्रास्ट रंग असल्यामुळे दिव्यांगासाठी वापर करणे सोपे होईल. यामध्ये मतदान केंद्राबद्दल माहिती उपलब्ध असून ज्यामध्ये आपले मतदान केंद्राचे स्थान, मतदान केंद्र, उपलब्ध प्रवेश योग्यता आणि अधिकारी संपर्क या तपशिलाचा समावेश आहे. दिव्यांगांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होताना येणाऱ्या कोणत्याही समस्येबद्दल ॲपवर तक्रार नोंदविता येणार आहे.

गुगल प्ले स्टोअरमध्ये https://play.google.com/store/apps/details?id=pwd.eci.com.pwdapp ॲपल फोनधारकांसाठी https://apps.apple.com/in/app/saksham-eci/id1497864568

### केवायसी ॲप

मतदारांना त्यांच्या उमेदवारांबाबतचा तपशील त्यामध्ये त्यांच्या नावे असलेल्या गुन्ह्यांचा तपशील, उमेदवाराची माहिती इत्यादी पाहता येऊ शकते. गुगल प्ले स्टोअरमध्ये https://play.google.com/store/apps/details?id=com.eci.ksa ॲपल फोनधारकांसाठी https://apps.apple.com/in/app/kyc-eci/id1604172836

### १९५० क्रमांकाची हेल्पलाइन

निवडणूकविषयी मतदारांना सर्व प्रकारची माहिती देण्यासाठी आणि त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी राज्य व जिल्हास्तरावर १९५० या टोलफ्री क्रमांकाची सुविधा सुरू करण्यात आलेली आहे. राज्यस्तरावर तसेच जिल्हास्तरावर संपर्क केंद्र स्थापन करण्यात आले आहेत.

**-संध्या गरवारे,**
विभागीय संपर्क अधिकारी,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

**जोडपत्र ४७**
**प्रपत्रे क– १ ते सी ८ आणि क / सीएअ**
**प्रपत्र क – १**

(उमेदवाराने वृत्तपत्रे, दूरदर्शनवर प्रसिद्ध करण्यासाठी)

**फौजदारी प्रकरणांबाबतचे घोषणापत्र**

माननीय सर्वोच्च न्यायालयाने २०११ ची रिट विनंती याचिका (दिवाणी) क्रमांक ५३६ (पब्लिक इंटरेस्ट फाऊंडेशन आणि इतर विरूद्ध युनियन ऑफ इंडिया व इतर) या प्रकरणी दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार

उमेदवाराचे नाव व पत्ता : प्रशांत रामशेठ ठाकूर,<br>श्री सदन, प्लॉट नं. ५८ ए, मिडलक्लास को. ऑ. हौ. सोसायटी, पनवेल,<br>ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६ .

राजकीय पक्षाचे नाव : भारतीय जनता पार्टी :
(अपक्ष उमेदवारांनी येथे ''अपक्ष'' असे लिहावे )

निवडणूकीचे नाव : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४

मतदारसंघाचे नाव : १८८ पनवेल विधानसभा मतदारसंघ

मी, प्रशांत रामशेठ ठाकूर (उमेदवाराचे नाव) वर नमूद केलेल्या निवडणुकीचा उमेदवार असून, माझ्या फौजदारी पूर्व चरित्रवद्दलचा पुढील तपशील जनतेच्या माहितीसाठी घोषित करीत आहे :–

(अ) प्रलंबित फौजदारी प्रकरणे

| अ.क्र. | न्यायालयाचे नाव | प्रकरण क्रमांक व दिनांक | प्रकरणाची सद्यस्थिती संबंधित अधिनियमांचे कलम (अधिनियमांची कलमे) आणि अपराधाचे (अपराधांचे ) थोडक्यात वर्णन |
|---|---|---|---|
| १ | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, बेलापूर | SCC. No. 3833/2023 सीबीडी, बेलापूर, पोलीस स्टेशन FIR No-CR No. 101/2022 FIR Date - 24/06/2022 | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे . अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही .<br>याप्रकरणातील लागू कायद्याची कलमे पुढीलप्रमाणे :–<br>भारतीय दंड संहिता कलम १४३, १४५, १८८, ३४१ महाराष्ट्र पो. का. क ३७ (१) (३), १३५, ३३<br>पोलीस स्टेशनचे हद्दीत, दिवंगत लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कृती समितीचे नमुद प्रमुख कार्यकर्ते व इतर २००० ते २५०० यांनी त्यांचे आंदोलनास परवानगी नाकारली असताना देखील तसेच कोणत्याही प्रकारची लाऊड स्पिकर परवानगी नसताना त्यांना एकत्र जमू नये असे कळविले असतानाही त्यांनी बेकायदेशीर जमाव जमवून रस्त्यावर स्टेज घालून वाहतुकीस अडथळा निर्माण केला व मा. पो. आयुक्त नवी मुंबई यांच्याकडील पोआ / नमुं / विशा / मआ ३१३८ / २०२२ दि. १३/०६/२०२२ अन्वये महाराष्ट्र पो. अधि. १९५१ चे कलम ३७ (१) (३) १३५ अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेले प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन केले म्हणून गुन्हा |
| २ | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, उरण | SCC. No. 38/2023 उरण, पोलीस स्टेशन, उरण, जि. रायगड FIR No-CR No. 55/2022 FIR Date - 17/03/2022 | सदरचा गुन्हा नमुद न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असून आरोपीवर समन्स काढणेवर आहे. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही.<br>याप्रकरणातील लागू कायद्याची कलमे पुढीलप्रमाणे :–<br>भा. दं.वि कलम ३४१, १८८ सह म. पो. का. कलम ३७ (१) (३)/१३५<br>पोलीस स्टेशनचे हद्दीत, दास्तान फाटा जासई, ता. उरण, जि. रायगड या ठिकाणी एकत्र येवून सिडको प्रशासनाचा निषेध करून समितीच्या पदाधिकारी यांनी जमलेल्या समुदायास संबोदित करून त्यांच्या मागण्यांसाठी १० ते १५ मिनिटे रस्ता रोको आंदोलन करून सार्वजनिक वाहतुकीस अडथळा निर्माण केला. तसेच मा. पोलिस आयुक्त सो, नवी मुंबई यांचेकडील<br>१) जा. क्र. कोरोना / मनाई आदेश /१२१३ /२०२२ दि. ४/ ३ / २०२२ रोजीचे फौजदारी प्रक्रीया संहिता सन १९७३ चे कलम १४४ (१) (३) पोलीस आयुक्त यांचे कार्यालय अन्वये<br>२) महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३७ (१) (३) प्रमाणे जा.क्र. पोआ/नमुं/ वि.शा./म. आ/ १३८७/२०२२, दि. १५/०३/२०२२ प्रमाणे निर्गमित आदेशाचे उल्लंघन केले म्हणून गुन्हा |
| ३ | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, पनवेल | SCC. No. 3618/2022 पनवेल शहर पोलीस स्टेशन, पनवेल, जि. रायगड FIR No-CR No. 32/2022 FIR Date - 13/01/2022 | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.<br>याप्रकरणातील लागू कायद्याची कलमे पुढीलप्रमाणे :–<br>भा. दं. वि. सं. कलम १८८, २६९, २७० सह साथरोग अधिनियम १८९७ कलम ३ सह म. कोविड १९ विनियमन २०२० कलम ११ सह अधिनियम महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) १३५<br>पोलीस स्टेशनचे हद्दीत, दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्व पक्षीय कृती समिती तसेच २१ गाव प्रकल्पवाधित कृती समिती यांच्यावतीने दिवंगत लोकनेते दि. वा. पाटील यांचे जयंतीनिमित्त नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ गाभा क्षेत्र, भराव कोल्ही – कोपर याठिकाणी भुमीपुत्र परिषद कार्यक्रमाचे विनापरवाना आयोजन करून अंदाजे ६०० ते ७०० जनसमुदाय जमवून उपस्थित जनसमुदाय यांनी सामाजिक अंतर राखले नाही, मास्क परिधान न करता कोविड नियमांचे उल्लघंन करून सदर कार्यक्रमाची परवानगी न घेता मा. पोलीस आयुक्त सो, नवी मुंबई यांनी जारी केलेल्या मनाई आदेशाचा भंग केला म्हणून पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या विरोधात सरकारतर्फे फिर्याद आहे. |
| ४ | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, पनवेल | SCC. No. 3204/2022 तळोजा पोलीस स्टेशन, तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड FIR No-CR No. 252/2021 FIR Date - 25/08/2021 | न्यायप्रविष्ठ . अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही .<br>भा. दं. वि. सं. कलम १८८, २६९,२७०,<br>सह साथ रोग अधिनियम १९५१ चे कलम ३<br>सह राष्ट्रीय आपती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ व<br>तसेच महाराष्ट्र पोलीस अधि. १९५१ चे कलम ३७ (१), १३५<br>पोलीस स्टेशनचे हद्दीत, कोरोना काळामध्ये कोणतीही परवानगी न घेता इतर लोकांसह काम बंद आंदोलन करण्याचा प्रयत्न |
| ५ | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, उरण | SCC. No. 145/2023 उरण, पोलीस स्टेशन, ता. उरण, जि. रायगड FIR No - CR No. 245/2021 FIR Date - 09/08/2021 | सदरचा गुन्हा नमुद न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असून आरोपीवर समन्स काढणेवर. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही.<br>भा. दं. वि. कलम १८८, २६९, २७० साथीचे रोग कलम ३<br>पोलीस स्टेशनचे हद्दीत, आरोपींनी विना परवाना मशाल मोर्चाचे आयोजन करून ५ पेक्षा अधिक लोकांना एकत्र करून महाराष्ट्र शासनाने कोरोना १९ संसर्गजन्य रोगाच्या अनुषंगाने लागू केलेल्या नियमांचे उल्लंघन केले. तसेच पोलीस आयुक्त नवी मुंबई यांनी जारी केलेल्या<br>जाक / पोआ/ विशा / मआ / ३५३७ / २०२१ दि. ०२/०८/२०२१ अन्वये महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३७ (१) (३) १३५ अन्वये तसेच<br>२) जाक्र / कोरोना / मनाई आदेश / ३५३५ / २०२१ दि. ०३/०८/२०२१ अन्वये मनाई आदेशाचे उल्लंघन केले म्हणून गुन्हा |
| ६ | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, पनवेल | SCC. No. 6909/2023 कामोठे पोलीस स्टेशन, ता. पनवेल, जि. रायगड FIR No - CR No. 325/2021 FIR Date - 26/06/2021 | न्यायप्रविष्ठ . अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही.<br>भा. दं. वि. सं. कलम १८८,<br>महाराष्ट्र पोलीस अधि. १९५१ चे कलम ३७ (१) (३), १३५<br>पोलीस स्टेशनचे हद्दीत आरोपीत आंदोलनकर्ते यांनी कोणतीही पूर्व परवानगी न घेता एकत्र जमून हातात सरकारी विरोधी फलक व बॅनर घेवून सरकार विरोधी घोषणा देत भाषणे करून एमजीएम हॉस्पीटल समोर पनवेल सायन रोडवर उतरून रास्ता रोको करून चक्काजाम आंदोलन केल्याने त्यांनी मा. पोलीस आयुक्त सो. नवी मुंबई यांचेकडील जा.क्र. पोआ/नमुं / विशा / म आ / २८१७ / २०२१, दि. १९/०६/२०२१ च्या मनाई आंदेशाचा भंग केला म्हणून गुन्हा |
| ७ | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, बेलापूर | SCC. No. 2924/2022 एनआरआय, पोलीस स्टेशन, सीबीडी, बेलापूर FIR No-CR No. 147/2021 FIR Date - 24/06/2021 | न्यायप्रविष्ठ अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही.<br>भारतीय दंड संहिता कलम १४३, ३४१, १८८, २६९, २७० साथ रोग अधिनियम १८९७ कलम ३,<br>महाराष्ट्र कोविड १९ विनियन २०२० कलम ११,<br>म .पो. अधि. १९५१ चे कलम ३७ (१) (३), १३५, ११५ /११७<br>सार्वजनिक मालमत्ता विद्रुपिकरण कलम ३. ध्वनी प्रदुषण नियमन कायदा २००० कलम १५, १९<br>फिर्यादी यांनी पोलीस आयुक्त सो, नवी मुंबई यांच्याकडील<br>१) जा . क्र . विशा/ नमुं /कामगार / सिडको घेराव/२८५७/२०२१ दि. २२/०६/२०२१ अन्वये फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ कलम १४४ (१) (३) व<br>२) जा. क्र. पोआ / विशा / मआ / २८१७ / २०२१ दि. १९/०६/२०२१ अन्वये महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३ (१) (३) १३५ अन्वये तसेच<br>३) जा. क्र. कोरोना / मनाई आदेश / २६३६ / २०२१ दि.०६/०६/२०२१ अन्वये मनाई आदेश जारी असून पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात त्याची प्रसिद्धी देखील करूनही लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे आयोजक यांनी अंदाजे १८००० ते २०००० लोकांचा विनापरवाना बेकायदेशीर जमाव जमवून उपस्थित राहुन सार्व जनिक वाहतुकीस अडथळा करून रस्ता अडवून पामबिच रोडवर से . नं. नवीन ५०, सीवुड सिग्नलजवळील असलेल्या रेल्वे ओव्हर ब्रीजच्या जवळ स्टेज तयार केलेले दोन मोठे ट्रेलर आडवे उभे करून त्यावर विनापरवाना लाऊड स्पिकर लावून घोषणा देवून चिथावणीखोर भाषणे केली व प्रमुख नेते व उपस्थित जनसमुदाय यांनी सामाजिक अंतर राखले नाही, मास्क परिधान न करता कोविड नियमांचे उल्लंघन केले तसेच नवी मुंबई महानगरपालिका समोरील किल्ला सिग्नल ते एनआरआय कॉम्प्लेक्स सिग्नल पर्यंतच्या रोडच्या मध्यभागी असलेल्या वीजेचा खांब तसेच झाडावर मोठया प्रमाणावर बॅनर्स व झेंडे लावून सार्वजनिक मालमत्तेचे विद्रुपीकरण केले. तसेच सभास्थळी व परिसरात मोठ्या प्रमाणात पिण्याच्या पाण्याच्या प्लॅस्टीकच्या रिकाम्या वाटल्या, नाष्टयाचे रिकामे पाकीटे, कागदी पत्रावळया टाकून केरकचरा केला. तसेच सदर आंदोलनाचे विनापरवाना ड्रोनद्वारे शुटींग केले म्हणून वरील कलमान्वये सरकारतर्फे फिर्याद दिल्याने गुन्हा नोंद |
| ८ | मे. मुख्य सत्र न्यायाधिश, रायगड, अलिबाग | SCC. No. 1397/2022 उरण पोलीस स्टेशन, ता. उरण, जि. रायगड FIR No-CR No. 183/2021 FIR Date - 10/06/2021 | सदर खटला नमुद कोर्टामध्ये न्यायप्रविष्ठ आहे. त्यामध्ये दि. ०३/०२/२०२४ रोजी दोषारोप ठेवण्यात आला आहे व खटल्याची संपरिक्षा सुरू आहे.<br>भा. दं. वि. कलम १८८, २६९, २७०<br>साथीचे रोग कलम ३<br>पोलीस स्टेशनचे हद्दीत, आरोपीत यांनी लोकनेते दि. बा. पाटील यांचे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास नाव देण्यावावत दि. १०/०६/२०२१ रोजी लोकनेते दि. बा. पाटील सर्वपक्षीय कृती समितीच्यावतीने मानवी साखळी आंदोलन करण्यात आले होते. सदर आंदोलनाची पूर्व तयारी तसेच लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी जासई गाव व उरण परिसरामध्ये मोटार सायकल रॅलीचे आयोजन करून एकत्रित जमून कोरोना रोगाचा संसर्ग व प्रादुर्भावाच्या अनुषंगाने सोशल डिस्टंसिंगचे पालन न करता लोकांची सुरक्षितता धोक्यात आणून व महाराष्ट्र शासनाचे आदेशाचे उल्लंघन केल्याने तसेच कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी शासनाच्या वतीने जारी करण्यात आलेल्या विविध उपाययोजनेचे पालन न केल्याने तसेच मा. पोलीस आयुक्त सो, नवी मुंबई यांनी जाहिर केलेल्या मनाई आदेशाचा भंग केला म्हणून गुन्हा |
| ९ | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, पनवेल | SCC. No. 3990/2021 पनवेल शहर पोलीस स्टेशन, ता. पनवेल, जि. रायगड FIR No-CR No. 309/2021 FIR Date - 10/06/2021 | न्यायप्रविष्ठ. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही.<br>भा. दं. वि. सं. कलम १८८, २६९, २७०,<br>सह महाराष्ट्र पोलीस अधि . सन १९५१ चे कलम ३७ (१) (३), १३५<br>सह साथीरोग अधिनियम १८९७ कलम ३<br>सह आपत्ती व्यवस्थापन अधि. २००५ चे कलम ५१<br>पोलीस स्टेशनचे हद्दीत, दि. १०/०६/२०२१ रोजी सकाळी १० ते १२ वा. दरम्यान दि. बा. पाटील सर्वपक्षीय कृती समितीचे पदाधिकारी व त्यांच्या मार्गदर्शनाखाली १८ गाव समितीचे सदस्य असे एकूण सुमारे १५०० कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी पनवेल शहर पोलीस ठाणाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते ठाणा नाका, वडघर ते बंबावीपाडा मेन रोडवर व कोल्ही कोपर येथील दत्त मंदीरासमोर नियोजित विमानतळाच्या जागेवर मोकळया मैदानात एकत्र येवून सामाजिक अंतराचे पालन न करता नागरिकांच्या आरोग्याची सुरक्षितता धोक्यात आणून कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी शासनाच्यावतीने जारी करण्यात आलेल्या विविध उपाययोजनांचे पालन न केल्याने तसेच मा. पोलीस आयुक्त सो., नवी मुंबई यांनी जारी केलेल्या मनाई आदेशाचा भंग केला म्हणून गुन्हा |
| १० | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, पनवेल कोर्टाच्या वेबसाईटवरती या गुन्ह्याची माहिती मिळत नाही. संबंधित न्यायालयाकडून कोणतेही समन्स प्राप्त नाही. खारघर पोलीस स्टेशन यांच्याकडून मिळालेल्या माहितीप्रमाणे मा. न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात कोर्ट केस नं. एम.ए.नं. २८१/२०१३ दाखल आहे. | खारघर पोलीस स्टेशन, ता. पनवेल, जि. रायगड FIR No-CR No. 72/2010 FIR Date - 27/09/2010 | न्यायप्रविष्ठ. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही.<br>भा. दं. वि. सं. कलम १८८,<br>सह महाराष्ट्र पोलीस अधि. सन १९५१ चे कलम ३७ (१) (३), १३५<br>पोलीस स्टेशनचे हद्दीत, यातील अटक आरोपी यांनी व पळून गेलेल्या आरोपी यांनी वेकायदेशीर जमाव जमवून शाळेची फी वाढी संदर्भात आंदोलन करून मा. पोलीस आयुक्त कायदा कलम ३७ (१,३), १३५ या मनाई आदेशाचा तसेच पोलीसांनी दिलेल्या लेखी आदेशाचा भंग केला म्हणून गुन्हा. |

| (ब) फौजदारी अपराधांसाठी दोषसिद्ध ठरविलेल्या प्रकरणांचा तपशील | | | जास्तीत जास्त ठोठावलेली शिक्षा |
|---|---|---|---|
| अ.क्र. | न्यायालयाचे नाव व आदेशाचा (आदेशांचे) दिनांक | अपराधाचे (अपराधांचे) वर्णन व ठोठावलेली शिक्षा | |
| लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

* राज्यसभेच्या निवडणुकीच्या किंवा विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या बाबतीत विधानसभा सदस्यांनी मतदारसंघाच्या नावाच्या जागी संबंधित निवडणुकीचे नाव नमुद करावे.

**टिप : –**

१. उमेदवारांविरूद्धच्या प्रलंवित असलेल्या फौजदारी खटल्यांबाबतचा तपशील ठळक अक्षरात असावा.
२. वृत्तपत्रांमधील मजूकर किमान १२ या टंक (फाँट) आकारात प्रसिद्ध केला जाईल.
३. प्रत्येक प्रकरणासाठी स्वतंत्र ओळींमध्ये स्वतंत्रपणे तपशील देण्यात यावा.
४. जर उमेदवार विशिष्ट पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढवत असेल तर त्याने / तिने पक्षाला त्याच्या / तिच्या विरूद्ध प्रलंबित असलेल्या फौजदारी खटल्यांबाबत कळवणे आवश्यक आहे.
५ . उमेदवार अशा प्रसिद्धीनंतर तात्काळ फौजदारी खटल्यांबाबत प्रतिज्ञापत्राच्या प्रसिद्धतीबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला कळवेल. याशिवाय, तो निवडणूकीचा निकाल घोषीत झाल्यापासून ३० दिवसांच्या आत निवडणूक खर्चाच्या हिशेबासह प्रपत्र सी–४ मध्ये प्रकरणांच्याबाबतीत प्रतिज्ञापत्राच्या प्रसिद्धीबाबतचा अहवाल सादर करील.
(अ) लोकसभा व विधानसभा निवडणुकींच्याबाबतीत, हे संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे सादर केले जाईल.
(ब) राज्यसभा व राज्य विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या बाबतीत, हे संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर केले जाईल. हे उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिनांकाच्या दुसऱ्या दिवसापासून आणि मतदानाच्या दिनांकापूर्वी दोन दिवस अगोदरपर्यंत वृत्तपत्र व दूरदर्शनवर प्रसिद्ध केले जाऊ शकते.

# आचारसंहितेमध्ये सवा कोटींची रोकड जप्त

**पनवेल : वार्ताहर**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत नियुक्त करण्यात आलेल्या फिरते निगराणी आणि स्थिर देखरेख पथकाने गेल्या १५ दिवसांमध्ये बेकायदेशीररित्या रक्कम नेली जाणारी तीन वाहने पकडून त्यातून तब्बल एक कोटी १४ लाख ५७ हजार रुपयांची रोकड जप्त केली आहे.

याशिवाय नवी मुंबई पोलिसांनी अंमली पदार्थाची तस्करी करणारे, बेकायदा मद्य बाळगणारे आणि विकणारे, तसेच बेकायदा शस्त्र बाळगणाऱ्या आणि त्याची विक्री करणाऱ्यांवरदेखील धडक कारवाई केली आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी संपूर्ण महाराष्ट्रात येत्या २० नोव्हेंबर रोजी प्रत्यक्ष मतदान होणार आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत ऐरोली, बेलापूर, पनवेल आणि उरण या चार विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. चार विधानसभा क्षेत्रात निवडणुकीच्या कालावधीत कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी नवी मुंबई पोलिसांकडून प्रयत्न करण्यात येत आहेत. निवडणूक आयोगाकडून लागू करण्यात आलेल्या आदर्श आचारसंहितेचा भंग होऊ नये तसेच आचारसंहितेचे



काटेकोर पालन व्हावे यासाठी नवी मुंबई पोलिसांकडून विशेष खबरदारी घेतली जात आहे. त्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत फिरते निगराणी पथक (एफएसटी) तसेच स्थिर देखरेख पथक (एसएसटी) नियुक्त करण्यात आले आहेत. या पथकाच्या माध्यमातुन बेकायदेशीरपणे नेली जाणारी मोठी रोकड, अंमली पदार्थ, अवैध मद्यसाठा आणि मद्याची वाहतूक करणार्यांवर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. १५ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर या कालावधीत फिरते आणि स्थिर देखरेख पथकाने तीन वेगवेगळ्या कारवायांमध्ये रोख रक्कम घेऊन जाणारी तीन वाहने पकडून त्यातून एक कोटी १४ लाख ५७ हजाराची रक्कम पकडली आहे. ही रोख रक्कम कोषागारात जमा करण्यात आली असून या रोख रक्कमेबाबत आयकर विभागाकडून अधिक तपास करण्यात येत आहे.

### बेकायदा शस्त्रे जप्त

नवी मुंबई पोलिसांनी निवडणूक आचारसंहितेच्या काळात अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांचीही धरपकड केली असून आतापर्यंत पोलिसांनी अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात १६ गुन्हे दाखल करून त्यांच्याकडून वेगवेगळ्या प्रकारचे १६ शस्त्रे जप्त केली आहेत. यात दोन पिस्टल तसेच चार जिवंत काडतुस जप्त केले आहेत. त्याचप्रमाणे तलवार, चॉपर, सुरा, चाकू यासारखी १४ हत्यारेदेखील जप्त करण्यात आली आहेत.

निवडणुकीच्या काळात दारुची मोठ्या प्रमाणात अवैध विक्री केली जाते. दारुच्या अवैध विक्रीला आळा घालण्यासाठी पोलिसांकडून सातत्याने कारवाया सुरू आहेत. आतापर्यंत नवी मुंबई पोलिसांनी वेगवेगळ्या ठिकाणी छापे मारुन दारू विव्रेत्यांवर तसेच गावठी हातभट्टीची दारु गाळणाऱ्यांवर १२७ कारवाया केल्या आहेत. या कारवाईत पोलिसांनी वेगवेगळ्या ठिकाणी छापेमारी करून आठ लाख १९ हजार रुपये किंमतीची २४७०.०९ लिटर दारु जप्त केली आहे. त्याचप्रमाणे गुटखा आणि पानमसाला विक्री-वाहतूक करणार्यांविरोधात १० कारवाया करुन १० लाख २५ हजार २१९ रुपये किंमतीचे १००६० गुटख्याचे पाऊच जप्त केले आहेत. त्याशिवाय पोलिसांनी या कारवायांमध्ये एक चार चाकी आणि दोन दुचाकी वाहने तसेच दारु बनविण्यासाठी लागणारे साहित्य, रोख रक्कम, ४२ मोबाईल फोन आणि एक लॅपटॉपसुध्दा जप्त केला आहे.

नवी मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथक आणि पोलीस ठाणे स्तरावर अंमली पदार्थाची तस्करी, सेवन करणार्यांविरोधातही मोठी कारवाई केली असून आचारसंहिता लागू झाल्यापासून पोलिसांनी आतापर्यंत अंमली पदार्थ तस्करीच्या १८ कारवाया केल्या आहेत. यात एक कोटी दोन लाख ५० हजार रुपये किंमतीचे ४१० ग्रॅम वजनाचे कोकेन, २८ लाख ४७ हजार ५०० रुपये किंमतीचे १२४.१० ग्रॅम एमडी तसेच आठ लाख २८ हजार ३५० रुपये किंमतीचे ३४.८२ ग्रॅम वजनाचे हेरॉईन, तर आठ लाख ९५ हजार रुपये किंमतीचा ३५.४२ ग्रॅम वजनाचा गांजा असे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत.

## खारघरमध्ये पैशांसाठी मित्राचा खून

**नवी मुंबई : बातमीदार**

उसण्या घेतलेल्या ३० हजार रुपयांसाठी मित्राचीच दगडाने ठेचून हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना खारघरमध्ये घडली होती. बेवारस मृतदेह आढळल्यानंतर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी गुन्ह्याचा उलगडा केला. या प्रकरणी मुंबईतून एकाला अटक केली आहे. दारू पिण्याच्या बहाण्याने त्याला खारघरमध्ये आणून पार्टीच्या ठिकाणीच त्याची हत्या केली.

खारघर येथील भारती विद्यापीठ परिसरात खारघर टेकडीलगत १ नोव्हेंबरला बेवारस मृतदेह मिळून आला होता. या अनुषंघाने गुन्हे शाखा सहायक आयुक्त अजयकुमार लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली कक्ष ३ चे वरिष्ठ निरीक्षक हनीफ मुलानी यांनी सहायक निरीक्षक संतोष चव्हाण, एकनाथ देसाई, सुधीर पाटील, राजकुमार दुधाळ, राजेश मोरे आदींचे पथक केले होते. तपासात घटनेच्या वेळी मृत व्यक्ती एका व्यक्तीसोबत त्याठिकाणी गेला होता असे दिसून आले. त्यानुसार गुन्हे शाखेच्या पथकाकडून त्या व्यक्तीचा शोध घेण्यात आला.

सीसीटीव्ही व इतर तांत्रिक तपासादरम्यान ही व्यक्ती मुंबईत नेहरूनगर परिसरात असल्याचे समजले असता त्या ठिकाणी सापळा रचून कमल ढोलपुरी (वय ३६) याला ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता त्याने मित्र विकास बोरा याचा खून केल्याची कबुली दिली.

## सीबीडीतून २५ हजारांचा गांजा जप्त

**नवी मुंबई : बातमीदार**

सीबीडी येथील टाटानगर झोपडपट्टीमधून पोलिसांनी २५ हजार रुपयांचा गांजा जप्त केला आहे. याप्रकरणी एका महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सीबीडी सेक्टर १० येथील टाटानगर झोपडपट्टीत गांजा विक्री चालत होती. यापूर्वीदेखील पोलिसांनी कारवाई केली आहे. त्यानंतरही पुन्हा अवैध धंद्यांना थारा मिळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून वरिष्ठ निरीक्षक संदेश रेवले यांनी निरीक्षक संजय परदेशी, धनश्री पवार यांचे पथक केले होते.

या पथकाने बुधवारी दुपारी परिसरात पाळत ठेवून फरिदा शेख हिच्या झोपडीची झडती घेतली. त्यामध्ये तिच्याकडे २५ हजार रुपये किमतीचा एक किलो गांजा मिळून आला. याप्रकरणी तिच्यावर सीबीडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## तपासणीदरम्यान आढळली तलवार

**नवी मुंबई : बातमीदार**

तलवार बाळगणाऱ्या एकावर एपीएमसी पोलिसांनी कारवाई केली आहे. मलखान खान (वय ३३) असे त्याचे नाव असून, तो पुनित कॉर्नर झोपडपट्टीत राहणारा आहे.

गस्तीदरम्यान पोलीस संशयित तरुणांची तपासणी करत होते. त्या दरम्यान खान याची तपासणी केली असता, त्याच्याकडे पोलिसांना तलवार सापडली.

याबाबत विचारपूस केली असता खान उत्तर देऊ शकला नाही. अखेर पोलिसांनी त्याला अटक करता त्याच्यावर गुन्हा दखल केला.




**उरण : विधानसभा निवडणुकीसाठी भेंडखळ शाळेच्या वतीने रांगोळीद्वारे मतदान जनजागृती करण्यात आली आहे.**

## आमदार महेश बालदी यांनी विकासाची गंगा आणली -मुकुंद गावंड

**उरण : वार्ताहर**

उरणमध्ये आमदार महेश बालदी यांनी विकासाची गंगा आणलेली असल्याने त्यांचा विजय निश्चित असल्याचे मत भाजप उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड यांनी व्यक्त केले.

ते म्हणाले की, उरणच्या विकासाचा महामेरू म्हणजे साक्षात आमदार महेश बालदी. उरणची ट्रेन सेवा चालू करण्यात आमदार महेश बालदी यांनी केलेल्या प्रयत्नामुळेच उरण ट्रेन सेवा ही लवकर सुरू झाली आहे. घारापुरी बेटावर लाईट आणण्याचे महत्वपूर्ण काम त्यांनी पूर्ण केले आहे. करंजा जेटीचे १५० कोटींचे काम पूर्ण केले आहे आणि अजून १५० कोटीचा निधी आणणार आहेत. सर्वांना आदर असणारे शिवस्मारक जासई येथे बांधले आहे. गावोगावी विकासाची गंगा आणली आहे. ५००० कोटींची कामे केली आहेत आणि जर का आपण पुन्हा विधानसभेत पाठवले तर १०००० कोटींची कामे करतील हे आम्ही आत्मविश्वासाने सांगतो.

याsाबतच इर्शाळवाडीवरील भयानक प्रकार पाहता त्या रात्रीचे वाडीवर चढून तेथील लोकांची आपुलकीने विचारपूस करून मदत केली. कोविड काळात तातडीने उलवे येथे रुग्णांची व्यवस्था करून त्यांना दिलासा देण्याचे काम केले, अशीअनेक कामे करणारे विकासपुरुष म्हणून आमदार महेश बालदी आहेत मला अभिमान आहे मी त्यांचा एक सच्चा कार्यकर्ता म्हणून त्यांच्यासोबत काम करत आहे, असे विचार मुकुंद गावंड यांनी मांडले.



**नवी मुंबई : वाशी सेक्टर १७मध्ये दररोज दिवसभर अनेक ट्रक उभे असतात. या ट्रकवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी येथील अन्य वाहनचालक करीत आहेत.**

# रिक्षा आणि बस स्टँडवर मतदान जनजागृती

## ऐरोली आणि बेलापूर विधानसभा मतदारसंघात प्रभावी अंमलबजावणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील ऐरोली व बेलापूर या दोन्ही विधानसभा मतदारसंघात मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी निवडणूक कार्यालये तसेच नवी मुंबई महापालिका यांच्या वतीने मतदार जागरुकतेच्या स्वीप कार्यक्रमांवर भर देण्यात येत आहे.

या अंतर्गत आज बिंदू माधव नगर दिघा येथील महिला बचत गटांना एकत्रीत करीत मतदार प्रतिज्ञा घेण्यात आली. २० नोव्हेंबर रोजी मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन करण्यात आले. महिला बचत गटातील सदस्यांनी आपल्या



परिचितांना मतदान करण्याचे आवाहन करावे असेही सूचित करण्यात आले. अशाचप्रकारे दिघा विभाग कार्यालयातील कर्मचारी व स्वच्छता मित्र यांनीही एकत्रीत येत मतदान करण्याचा निर्धार केला व मतदानाची प्रतिज्ञा सामुहिकरित्या ग्रहण केली.

ऐरोली येथील चिंचपाडा भागातही मागील निवडणूकीत कमी प्रमाणात मतदान झाले अशा मतदान केंद्रांच्या परिसरात गृहभेटी देत जनजागृती करण्यात आली व मतदानाचा अधिकार बजावण्याचे आवाहन करण्यात आले. वाशी येथे सेक्टर १६ येथील मुख्य चौकात उपस्थित नाका कामगारांशी संवाद साधण्यात आला व त्यांना मतदान करण्याविषयी प्रोत्साहित करण्यात आले.

६ नोव्हेंबर रोजी नेरूळ रेल्वे स्थानक, नेरूळ बस डेपो, सेक्टर १५ अभ्युदय बँके समोरील रिक्षा स्टँड अशा वर्दळीच्या ठिकाणी नागरिकांना एकत्र करुन मतदाना विषयी जनजागृती करण्यात आली तसेच मतदानाची प्रतिज्ञाही घेण्यात आली. विशेष म्हणजे या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात ठेवलेल्या मतदार जनजागृती सेल्फी स्टँडवर अनेक नागरिकांनी छायाचित्रे काढून आपण मतदान करणार असल्याची ग्वाही दिली व इतरांनीही मतदान करावे असे आवाहन केले.

रबाळे गाव येथील नवी मुंबई महापालिकेच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात उपस्थित डॉक्टर, कर्मचारी तसेच रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसोबत मतदार जागरुकता प्रतिज्ञा घेण्यात आली व सर्वांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. त्याचप्रमाणे गोठीवली गाव येथील विश्वास बहुउद्देशीय विकास संस्थेमधील महिला सदस्यांशी सुसंवाद साधत त्यांना मतदानाचा अधिकार बजावण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच मतदार प्रतिज्ञा घेण्यात आली.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार, १५० ऐरोली व १५१ बेलापूर विधानसभा मतदार संघाचे स्वीप नोडल अधिकारी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या नियंत्रणाखाली, ऐरोलीच्या स्वीप नोडल अधिकारी उपआयुक्त अभिलाषा म्हात्रे व बेलापूरचे स्वीप नोडल अधिकारी सहाय्यक आयुक्त सागर मोरे यांच्या माध्यमातून अधिकारी, कर्मचारी यांच्या सहयोगाने स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदार जनजागृतीपर उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत.

## आपटा येथे शिवमंदिराची स्वच्छता अन् दीपोत्सव





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लखलखत्या दिव्याचा सण म्हणजे दिवाळी, सर्वसाधारणपणे सर्वजण दिवाळीला फटाके उडवतात, फराळ करून ,मित्रांसमवेत मस्त मजेमध्ये दिवाळीचे चार दिवस साजरे करत असतात. यावेळी इन्फिनीटी फाऊंडेशनचे सदस्य व आपटे गावातील ग्रामस्थांनी आपटे गावातील आठशे वर्षापूर्वीचे पुरातन शिवमंदिराची साफसफाई करून व दीपोत्सव साजरा केला.

आपटे गावात सुमारे आठशे वर्षांपूर्वीचे पुरातन शिवमंदिर आहे. आजूबाजूला वाढलेले गवत, शेवाळ्याने भरलेली दीपमाळ अशी भग्नावस्था या शिवमंदिरला आली होती. भाऊबीजेच्या मुहूर्तावर इन्फिनीटी फाऊंडेशनच्या सुमारे २० सदस्यांनी व आपटे गावातील ग्रामस्थांनी सर्वांनी मिळून हे पुरातन मंदिर स्वच्छ केले. मंदिराच्या परिसरातील वाढलेले गवत काढले, दीपमाळेवरील शेवाळे घासून काढले, मंदिरावर उगवलेले गवत काढून सगळे मंदिर लखलखीत केले.

सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी तरुणांनी एकत्र यावे या प्रेरणेने, इन्फिनीटी फाऊंडेशनचे अध्यक्ष आयुफ अकुला, उपाध्यक्ष मिहिर रेडीज, सचिव यश दुबे, सचिव प्रणय उसत्कर व इतर सदस्यांनी दिवसभर मंदिराची साफसफाई केली. त्यानंतर संध्याकाळी मंदिर परिसरात दिवे लावून दीपोत्सव साजरा केला.





## बँक ऑफ इंडियाच्या विभागीय कार्यालयात सतर्कता जनजागृती

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सतर्कता जनजागृती सप्ताह २०२४ अंतर्गत बँक ऑफ इंडियाच्या नवी मुंबई विभागीय कार्यालयाच्या सर्व शाखांमध्ये सतर्कता जनजागृती कार्यक्रम राबविले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून बँक ऑफ इंडियाच्या नवी मुंबई विभागीय कार्यालयात कर्मचाऱ्यांनी वचनबद्धतेची शपथ घेतली.

या कार्यक्रमाला नवी मुंबई विभागीय प्रबंधक अतुल सातपुते, उप विभगीय प्रबंधक, अंतर्यामी सारंगी तसेच सतर्कता विभागाचे मुख्य व्यवस्थापक किशोर राम व इतर कर्मचारी उपस्थित होते.




बँक ऑफ इंडिया, नवी मुंबई विभागीय कार्यालय, यांनी दक्षता जागरुकता सप्ताह कार्यक्रमाचा एक भाग म्हणून सेक्टर ११ सीबीडी बेलापूर येथे मानवी साखळीचे आयोजन केले होते. बँकेचे कर्मचारी आणि अधिकारी रस्त्याच्या एका बाजूला उभे राहून फलक आणि बॅनर दाखवत होते आणि कार्यक्रमाशी संबंधित घोषणा देत होते. त्यांनी सेक्टर ११ बेलापूर येथे प्रतिकात्मक 'विजिलन्स वॉक' घेतला.

हा उपक्रम मुख्यालयाच्या सतर्कता विभागाच्या मार्गदर्शनाखाली होत असून, बँकेच्या सर्व व्यवहारांमध्ये प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि जबाबदारीचा संस्कार रुजविणे आणि भ्रष्टाचारविरोधी वचनबद्धता बळकट करणे हा या कार्यक्रमांचा उद्देश आहे. हा सप्ताह देशातील सार्वजनिक संस्थांमध्ये नैतिक कार्यसंस्कृतीला चालना देण्यासाठी दरवर्षी आयोजित केला जातो.

## उरण मतदारसंघातील उमेदवारांना आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये १९०-उरण विधानसभा मतदारसंघात एकूण १४ अधिकृत उमेदवार असून अंतिम झालेल्या उमेदवारांनी खर्च नोंदवही, निवडणूक खर्चासाठी उघडलेली स्वतंत्र बँक खाते पासबुक, निवडणूक खर्चाची प्रमाणके व उपप्रमाणके, रोख रक्कम तपशील इत्यादी व निवडणूक खर्चाशी सबंधित इतर अनुषंगिक कागदपत्रे/दस्तावेज खालीदिलेल्या तारखांना मा.निवडणूक खर्च निरीक्षक यांच्यासमोर तपासणीकरिता सादर करावीत, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी जनार्दन कासार यांनी केले आहे.

या खर्चाच्या नोंदवहीमध्ये नोंदविलेल्या लेख्यांची तपासणी, निवडणूक खर्चावर देखरेख सूचनांचा सारसंग्रह २०२४ मधील भाग-क (एक) मध्ये दिलेल्या निर्देशानुसार प्रचार कालावधीत किमान तीन वेळा होणे आवश्यक आहे. त्यानुसार भारत निवडणूक आयोग यांच्याकडून नियुक्त करण्यात आलेले निवडणूक खर्च निरीक्षक, १९०-उरण विधानसभा रमेश कुमार हे उमेदवारांच्या खर्च नोंदवह्यांची तपासणी पुढील नमूद वेळापत्रकानुसार करणार आहेत.

निवडणूक खर्च निरीक्षक, १९०-उरण विधानसभा यांच्यामार्फत उमेदवारांच्या खर्च नोंदवह्यांची तपासणी वेळापत्रक पुढीलप्रमाणे :- प्रथम, ९ नोव्हेंबर २०२४ वेळ दुपारी ३ ते सायंकाळी ६.३०, द्वितीय, १३ नोव्हेंबर २०२४ वेळ दुपारी ३ ते सायंकाळी ६.३०, तृतीय, १७ नोव्हेंबर २०२४ वेळ दुपारी ३.०० ते सायंकाळी ६.३०, स्थळ:- रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जासई, ता. उरण.

तपासणीवेळी उमेदवाराने आपले खर्च रजिस्टर नोंदवही विहित पद्धतीने सादर न केल्यास त्यांच्यावर लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७७ व भारतीय दंडसंहितेच्या कलम १७१-१ अन्वये पुढील कार्यवाही प्रस्तावित केली जाईल याची नोंद घ्यावी.

# आमदार रविशेठ पाटील यांच्या विजयासाठी स्वामी समर्थांना साकडे



**नागोठणे : बातमीदार**

खडकआळीतील श्री स्वामी समर्थांच्या मठात आमदार रविशेठ पाटील यांना निवडून आणण्यासाठी राष्ट्रवादी नेते नरेंद्र जैन व भाईसाहेब टके यांनी श्री स्वामी समर्थांना साकडे घातले. या वेळी महायुतीचे बहुसंख्य कार्यकत सहभागी झाले होते.

नागोठणे शहरात पेण सुधागड रोहा विधानसभा मतदार संघातील महायुतीच्या वतीने भाजपचे अधिकृत उमेदवार आमदार रविशेठ पाटील यांचा प्रचारास महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जोरदार सुरुवात केली असल्यामुळे महायुतीने विजयाच्या दिशेने जोरदार वाटचाल केली असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी पेण सुधागड रोहा विधानसभा मतदार संघातील महायुतीच्या वतीने भाजपचे अधिकृत उमेदवार आमदार रविशेठ पाटील यांना निवडून आणण्याचे आदेश आपल्या कार्यकर्त्यांना दिले असून या आदेशाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते तंतोतंत पालन करत असल्याचे दिसून येत आहे.

आमदार रविशेठ पाटील यांना निवडून आणण्यासाठी राष्ट्रवादीचे कार्यकर्ते जोमाने कामाला लागले आहेत. माजी राजिप सदस्य राष्ट्रवादी नेते नरेंद्र जैन व भाईसाहेब टके यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे शहरातील राष्ट्रवादीचे कार्यकर्ते प्रत्येक आळीमध्ये घरोघरी जाऊन आमदार रविशेठ पाटील यांना निवडून देण्याचे मतदारांना आवाहन करीत आहेत.

याचदरम्यान महायुतीचे कार्यकर्ते खडकआळीतील श्री स्वामी समर्थांच्या मठात दर्शनासाठी गेले. त्यावेळी राष्ट्रवादीचे नेते नरेंद्र जैन व भाईसाहेब टके यांनी आमदार रविशेठ पाटील यांना निवडून आणण्यासाठी श्री स्वामी समर्थांना साकडे घातले.

# श्रीवर्धनमध्ये तटकरेंवर शिंदे गट नाराज नाही

## शिवसेनेचे श्रीवर्धन शहरप्रमुख देवेंद्र भुसाणे यांची माहिती

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

मंत्री आदिती तटकरेंवर शिंदे गट नाराज असल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत, मात्र अशी कोणतीही परिस्थिती या ठिकाणी नाही. श्रीवर्धन मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, भाजप, रिपाइं ही महायुती ठाम असून महाड पोलादपूरचे आमदार भरत गोगावले यांच्या आदेशानुसार श्रीवर्धन मतदारसंघातील कार्यकर्ते आदिती तटकरे यांचे काम जोमाने करत आहेत, असे शिवसेनेचे श्रीवर्धन शहरप्रमुख देवेंद्र भुसाणे यांनी म्हटले आहे.

शिंदे गटातील एका पदाधिकाऱ्यांचे तटकरेंजवळ वैयक्तिक वाद असू शकतात, परंतु याचा अर्थ आदिती तटकरे यांच्यासाठी शिंदे गटाचे कार्यकर्ते काम करणार नाहीत हे चुकीचे आहे. आदिती तटकरे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या वेळेस आमदार भरत गोगावले स्वतः श्रीवर्धन येथे आपल्या हजारो कार्यकर्त्यांसह उपस्थित होते, तर आमदार गोगावले यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या वेळी तटकरेदेखील आपल्या हजारो कार्यकर्त्यांसोबत महाड येथे उपस्थित होते.

संपूर्ण श्रीवर्धन मतदारसंघांमध्ये महायुतीचा धर्म पाळून शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्ते आदिती तटकरे यांचे काम चांगल्या प्रकारे करत आहेत. कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम पसरविण्यासाठी अशा प्रकारच्या बातम्या काही लोकांनीच पसरविल्या असाव्यात, असे शिवसेनेचे श्रीवर्धन शहरप्रमुख देवेंद्र भुसाणे यांनी म्हटले आहे.


**निविदा सुचना**

**समृद्धभूमी को-ऑप हौ. सोसायटी लि. पालिदेवद, सुकापूर, नवीन पनवेल ४१०२०६**
वरील संस्थे तर्फे खालील कामा करिता निविदा मागवण्यात येत आहेत.

**कामाचे स्वरुप : -**
१) सोसायटी मधील ९ इमारतींना गेलेले तडे भरून काढणे.
२) संपूर्ण गळती बंद करणे.
३) संपूर्ण ९ इमारतीस रंगकाम करणे.
४) संपूर्ण इमारतीच्या छतावरील सद्यस्थितीत असलेले लोखंडी पत्रे बदलवून नवीन लोखंडी पत्रे बसविणे.

वरील नमूद कामाकरिता येणारा प्रत्यक्ष खर्च तसेच काम करण्याचे स्वरुप, दर्जा, कालावधीचे नियोजन, कार्यपद्धती, कामगार/सोसायटीमधील रहीवाशी यांची सुरक्षितता इ. बाबतची सविस्तर माहिती स्पष्ट नमूद करुन सिलबंद निविदाचा लिफाफा हा सोसायटीच्या कार्यालयामध्ये अध्यक्ष / सचिव यांच्याकडे दि.१४-११-२०२४ पर्यंत सादर करावा.

**नियम : -**
१) कंत्राटदार हा सरकारमान्य असणे अनिवार्य राहील.
२) निविदा सिलबंद असणे अनिवार्य राहील.
३) निविदा स्विकारणे/नाकारणे किंवा कामाचा कालावधी निश्चित करण्याबाबत सर्व अधिकार व हक्क सोसायटीकडे राखून ठेवण्यात येतील.
४) ज्याची निविदा मंजूर होईल त्याने १५ टक्के अनामत रक्कम डिमांड ड्राफ्ट (डी.डी) द्वारे सोसायटी च्या नावाने काम सुरु करण्यापूर्वी (WORK ORDER देण्यापूर्वी) सोसायटी कडे जमा करणे बंधन कारक राहील.

कंत्राटदाराने यापूर्वी वरील नमूद केलेल्या कामाचा अनुभव असणे आवश्यक असून यापूर्वी केलेल्या कामाची माहिती निविदामध्ये संलग्नित करावी.

तसेच सोसायटीसमवेत आवश्यक अटी / शर्तीसह नोंदणीकृत करारनामा केल्यानंतरच कामाचे कंत्राट देण्यात येईल.

संपर्कासाठी सोसायटीच्या कार्यालयामध्ये फक्त शनिवार, रविवार रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०२.०० पर्यंत प्रत्यक्ष भेट दयावी.

**दिनांक :- १०/११/२०२४**

**सही/- अध्यक्ष** | **सही/- सचिव** | **सही/- खजिनदार**
**समृद्धभुमी को-ऑप हौ. सोसायटी**


# श्रीवर्धनमध्ये रांगोळी स्पर्धेला प्रतिसाद

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

महेश्वर आळी मित्र मंडळ यांच्या वतीने दिवाळीनिमित्त खास जिवनेश्वर विभाग मर्यादित रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये एकूण २३ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. वयवर्ष ८ ते ४० या वयोगटातील स्पर्धकांनी ह्यात सहभाग नोंदवला होता.

या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक रोख रुपये ३,३३३ रुपये देवेंद्र भुसाणे यांच्याकडून, द्वितीय क्रमांक २,२२२ रुपये साठे मसाले यांच्या कडून व तृतीय क्रमांक १,१११ रुपये अनंत गुरव यांच्या कडून व प्रत्येक क्रमांकाला भव्य चषक व सन्मानचिन्ह हे मंडळाकडून देण्यात आले.

या स्पर्धेत आक्षिता भगत हिने प्रथम पारितोषिक, साक्षी वाणी हिने द्वितीय पारितोषिक व दिव्या माळी हिने तृतीय पारितोषिक पटकावले. या स्पर्धेला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमासाठी अनंत गुरव, निवास गुरव, श्रीकांत साठे, सुरेश साखरे, शंकर वाणी, मनोज गुरव, विजय साखरे या मान्यवरांची उपस्थिती लाभली. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून स्वराज भगत शैलेश साठे व अस्मिता नलावडे यांनी नि:पक्ष भूमिका बजावली.



प्रथम क्रमांक: अक्षिता भगत


पुणे येथील मे. मे. एस बी. पराते, न्यायाधीश कौटुबिंक न्यायालय क्र.५. यांचे कोर्टात
पी.ए. ५२९/२०२४
निशाणी क्र. २०
पुढील दिनांक ०७/१२/२०२

**जाहीर नोटीस**

श्री. अक्षय प्रकाश ठिगळे — अर्जदार
विरुध्द
१. सौ. इंदिरा अक्षय ठिगळे — जाबदेणार
२. श्री हितेश कोंडे

प्रति,
श्री हितेश कोंडे रा. ५७५७, Qcm, साई आंगण,
चिंतामणी चौक, बोरणपाडारोड, बदलापूर वेस्ट,
बदलापूर, महाराष्ट ४२१५०३

ज्याअर्थी वरील अर्जदार श्री. अक्षय प्रकाश ठिगळे यांनी जाबदेणार क्र.१. सौ. इंदिरा अक्षय ठिगळे जाबदेणार क्र. २. श्री हितेश कोंडे यांच्या विरुध्द हिंदु विवाह कायदा १९५५ चे कलम १३ (१) (आय ए) प्रमाणे घटस्फोट मिळणे करीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीसीव्दारे जाबदेणार, यांना कळविण्यात येते की, तुम्ही स्वतः दिनांक ०७/१२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात सदरहू प्रकरणी जाबदेण्यासाठी जातीने हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत एकतर्फे हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७.११.२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

दिनांक. ०७/११/२०२४
ठिकाण -पुणे

कोर्टाचा शिक्का

**हुकूमावरुन**
**सही/-**
**प्र. उपप्रबंधक**
**(सुहास महाडिक)**
**कौटुंबिक न्यायालय पुणे.**



पुणे येथील मे. मे. एस बी. पराते, न्यायाधीश कौटुबिंक न्यायालय क्र.५. यांचे कोर्टात
पी.ए. ५२९/२०२४
निशाणी क्र. १९
पुढील दिनांक ०७/१२/२०२४

**जाहीर नोटीस**

श्री. अक्षय प्रकाश ठिगळे — अर्जदार
विरुध्द
१. सौ. इंदिरा अक्षय ठिगळे — जाबदेणार
२. श्री हितेश कोंडे

प्रति,
सौ. इंदिरा अक्षय ठिगळे
रा. व्दारा... छाया हॉस्टेल, महिला सेवा मंडळ, संजीवन हॉस्पीटल समोर,
काशीबाई खिलारे पथ, कर्वे रोड, एरंडवणे, पुणे ४११००४. कायमस्वरुपी
पत्ता.. श्रीहरे कृष्ण सोसायटी, सेक्टर ५, रुम नं १०३, ए विंग, प्लॉट नं १२,
डिमार्ट रोड, पनवेल ४१०२०६.
कार्यालयीन पत्ता.. सह्याद्री सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल, व्लॉट नं ३० सी,
डेक्कन जिमखाना, कर्वे रोड, एरंडवणे, पुणे ४११००४.

ज्याअर्थी वरील अर्जदार श्री. अक्षय प्रकाश ठिगळे यांनी जाबदेणार सौ. इंदिरा अक्षय ठिगळे यांच्या विरुध्द हिंदु विवाह कायदा १९५५ चे कलम १३ (१) (आय ए) प्रमाणे घटस्फोट मिळणे करीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीसीव्दारे जाबदेणार, यांना कळविण्यात येते की, तुम्ही स्वतः दिनांक ०७/१२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात सदरहू प्रकरणी जाबदेण्यासाठी जातीने हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत एकतर्फा हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७.११.२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

**हुकूमावरुन**
**सही/-**
**प्र. उपप्रबंधक**
**(सुहास महाडिक)**
**कौटुंबिक न्यायालय पुणे.**

कोर्टाचा शिक्का

दिनांक. ०७/११/२०२४
ठिकाण -पुणे.


## जोडपत्र ४७

### प्रपत्र क - १

सदर प्रपत्र, उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिनांकाच्या दुस-या दिवसापासून आणि मतदानाच्या तारखेच्या दोन दिवस आधीपर्यंत वृत्तपत्रामध्ये आणि दूरदर्शनवर प्रसिध्द करता येईल.

(उमेदवाराने वृत्तपत्रे, दूरदर्शन यामध्ये प्रसिध्द करण्यासाठी)

**फौजदारी प्रकरणांबाबतचे घोषणापत्र**

माननीय सर्वोच्च न्यायालयाने २०११ ची रिट विनंती याचिका (दिवाणी) क्रमांक ५३६ (पब्लिक इंटरेस्ट फाऊंडेशन आणि इतर विरूध्द युनियन ऑफ इंडिया व इतर) या प्रकरणी दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी दिलेल्या निकालानुसार.

**उमेदवाराचे नाव व पत्ता** : **श्री. महेश रतनलाल बालदी**
घर नं. ६०४ ब, राधाकुंज बंगला, नागांव रोड,
ता. उरण, जि. रायगड, महाराष्ट्र ४००७०२.

**राजकीय पक्षाचे नाव** : भारतीय जनता पार्टी
(अपक्ष उमेदवारांनी येथे ''अपक्ष'' असे लिहावे )

**निवडणूकीचे नाव** : महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४

**मतदारसंघाचे नाव** : १९० उरण विधानसभा मतदारसंघ

मी, **श्री. महेश रतनलाल बालदी** (उमेदवाराचे नाव) वर नमूद केलेल्या निवडणुकीचा उमेदवार असून, माझ्या फौजदारी पूर्व चरित्राबदद्लचा पुढील तपशील जनतेच्या माहितीसाठी घोषित करीत आहे.

**(अ) प्रलंबित फौजदारी प्रकरणे**

| अ.क्र. | न्यायालयाचे नाव | प्रकरण क्रमांक व दिनांक | प्रकरणाची सद्यस्थिती | संबंधित अधिनियमांचे कलम (अधिनियमांची कलमे) आणि अपराधाचे (अपराधांचे ) थोडक्यात वर्णन |
|---|---|---|---|---|
| १ | JMFC उरण | SCC १४५/२०२३ गुन्हा रजि. नं. २४५/२०२१ | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही. | भा.दं.वि. १८८, २६९, २७० कोविड कालावधीत नियमांचे उल्लंघन करणे. |
| २ | सत्र न्यायालय अलिबाग | खाजगी खटला सेशन केस-४०/२०२३ | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही. | भा.दं.वि. ३५३ सरकारी कामात अडथळा निर्माण करणे. |
| ३ | JMFC उरण | SCC ३८/२०२३ गुन्हा रजि. नं. ५५/२०२२ | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही. | भा.दं.वि. ३४१,१८८, महाराष्ट्र पोलिस अधिनियम ३७ (१) (३), १३५ सरकारी नियमांचे पालन न करणे. |
| ४ | JMFC उरण | SCC ३५/२०२३ गुन्हा रजि. नं. १८४/२०२१ | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही. | भा.दं.वि. १८८, २६९, २७०, साथीचे रोग अधिनियम कलम - ३ कोविड कालावधीत नियमांचे उल्लंघन करणे. |
| ५ | JMFC पनवेल | SCC ३६१८/२०२२ गुन्हा रजि. नं. ३२/२०२२ | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही. | भा.दं.वि. १८८, २६९, २७०, महाराष्ट्र पोलिस अधिनियम ३७(१) (३), १३५ कोविड कालवधीत नियमांचे उल्लंघन करणे व लोक जमा करणे. |
| ६ | JMFC पनवेल बेलापूर,जि.ठाणे. | SCC २९२४/२०२२ गुन्हा रजि. नं. १४७/२०२१ | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही. | भा.दं.वि. १४३, ३४१, १८८, २६९, २७०, साथीचे रोग अधिनियम कलम ३ महाराष्ट्र पोलिस अधिनियम ३७(१) (३),१३५, ११५, ११७ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम कलम ३, ध्वनीप्रदुषण नियमन कलम १५ व १९ कोविड कालावधीत नियमांचे उल्लंघन करणे व लोक जमा करणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे व ध्वनीप्रदुषण करणे. |
| ७ | CJM अलिबाग | SCC १३९७/२०२२ गुन्हा रजि. नं. १८३/२०२२ | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामध्ये दि. ०३/०२/२४ रोजी दोषारोप ठेवण्यात आला आहे व खटल्याची संपरिक्षा सुरू आहे. | भा.दं.वि. १८८, २६९, २७०, EC ॲक्ट कलम-३ कोविड कालावधीत नियमांचे उल्लंघन करणे. |
| ८ | CJM अलिबाग | SCC १३९६/२०२२ गुन्हा रजि. नं. २४८/२०२१ | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामध्ये दि. ०३/०२/२४ रोजी दोषारोप ठेवण्यात आला आहे व खटल्याचीं संपरिक्षा सुरू आहे. | भा.दं.वि. १८८, २६९, २७० पोलिस अधिनियम ३७ (१) (क), १३५ कोविड कालावधीत नियमांचे उल्लंघन करणे व लोक जमा करणे. |
| ९ | CJM अलिबाग | RCC ८३/२०२० | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामध्ये दि. ११/०१/२४ रोजी दोषारोप ठेवण्यात आला आहे व खटल्याची संपरिक्षा सुरू आहे. | पर्यावरण संरक्षण कायदा कलम -१५ ध्वनीप्रदुषण (नियंत्रण व नियमन) नियम कलम - १९ गणेशोत्सव मिरवणुकी दरम्यान स्पिकर लावुन ध्वनीप्रदुषण करणे. |
| १० | CJM अलिबाग | RCC ८२/२०२० गुन्हा रजि. नं. २४/२०१० | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामध्ये दि. २८/०८/१३ रोजी दोषारोप ठेवण्यात आला आहे व खटल्याची संपरिक्षा सुरू आहे. | भा.दं.वि. ३२५, ३२४, ३२३, ५०४, ५०६(२), ३४ मारहाण करणे व शिवीगाळ करणे. |
| ११ | CJM अलिबाग | खाजगी खटला RCC ८१/२०२० | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामध्ये दि. ०७/०६/२२ रोजी दोषारोप ठेवण्यात आला आहे व खटल्याची संपरिक्षा सुरू आहे. | भा.दं.वि. ३२४, ३२३, ५०४, ५०६(२),५०९, ३४, १४७, १४८ मारहाण करणे व शिवीगाळ करणे. गैरकायद्याची मंडळी जमविणे, महिलेस लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करणे. |

**(ड) फौजदारी अपराधांसाठी दोषसिद्ध ठरविलेल्या प्रकरणांचा तपशील**

| अ.क्र. | न्यायालयाचे नाव व आदेशाचा (आदेशांचे) दिनांक | अपराधाचे (अपराधांचे) वर्णन व ठोठावलेली शिक्षा | ठोठावलेली सर्वाधिक शिक्षा |
|---|---|---|---|
| लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

* राज्यसभेच्या निवडणुकीच्या किंवा विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या बाबतीत विधानसभा सदस्यांनी मतदारसंघाच्या नावाच्या जागी संबंधित निवडणुकीचे नाव नमुद करावे.

**टिप : -**

१. उमेदवारांविरूध्दच्या प्रलंबित असलेल्या फौजदारी खटल्यांबाबतचा तपशील ठळक अक्षरात असावा.
२. वृत्तपत्रांमधील मजकूर किमान १२ या टंक (फॉंट) आकारात असावा.
३. प्रत्येक प्रकरणासाठी स्वतंत्र तपशील द्यावा.
४. एखादा उमेदवार एखादया विशिष्ट पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढत असेल तर, त्याने/तिने पक्षाला त्याच्या/तिच्या विरूध्द प्रलंबित असलेल्या फौजदारी खटल्यांबदद्ल माहिती देणे आवश्यक आहे.
५. उमेदवाराने प्रसिध्दी नंतर लगेच फौजदारी खटल्यांबाबत घोषणापत्र प्रसिध्द करण्याबाबत निवडणुक निर्णय अधिकाऱ्यास अहवाल द्यावा. याशिवाय, तो, निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत निवडणूक खर्चाच्या हिशेबासह प्रपत्र क्र. ४ मधील प्रकरणांबाबत घोषणापत्र प्रकाशित करण्याबाबतचा अहवाल सादर करील. (क) लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांच्या बाबतीत, हा अहवाल संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे सादर करण्यात येईल. (ख) राज्यसभा आणि राज्य विधानपरिषदेच्या निवडणुकांच्या बाबतीत, हा अहवाल संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर करण्यात येईल.

# भारताची दणदणीत विजयी सलामी

## द. आफ्रिकेचा पराभव; संजू सॅमसनचे तुफानी शतक

**डर्बन : वृत्तसंस्था**

भारताने पहिल्या टी-२० सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा ६१ धावांनी मोठा पराभव करून चार सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी मिळवली आहे. या सामन्यात नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने संजू सॅमसनच्या शतकाच्या जोरावर २० षटकांत आठ विकेट गमावत २०२ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात यजमान संघाने १७.५ षटकांत १४१ धावा केल्या आणि त्यांना ६१ धावांनी पराभव पत्करावा लागला.




दक्षिण आफ्रिका संघाची पहिली विकेट आठ धावा करून बाद झालेल्या एडन माक्ररमच्या रूपात पडली. ट्रिस्टन स्टब्सने ११ चेंडूत ११ धावा केल्या आणि तो झेलबाद झाला. क्लासेनने २५, तर रायनने २१ धावांची खेळी केली. या सामन्यात डेव्हिड मिलरने १८ धावा केल्या. पॅट्रिक क्रुगर एक धावा काढून बाद झाला. भारताकडून वरुण चक्रवर्ती आणि रवी बिश्नोई यांनी तीन विकेट घेतल्या. याशिवाय आवेश खानला दोन, तर अर्शदीप सिंगला एक विकेट मिळाली.

भारताला पहिला झटका अभिषेक शर्माच्या रूपाने बसला जो सात धावा करून झेलबाद झाला. त्यानंतर संजू सॅमसनने २७ चेंडूत षटकार लगावत आपले अर्धशतक पूर्ण केले. या सामन्यात कर्णधार सूर्यकुमार यादवने १७ चेंडूत २१ धावा केल्या आणि तो झेलबाद झाला. यानंतर संजूने ४७ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. तिलक वर्माने ३३ धावांची महत्त्वपूर्ण खेळी खेळली आणि तो बाद झाला. संजूने या सामन्यात १०७ धावांची खेळी खेळली आणि नंतर तो बाद झाला.

हार्दिक पांड्या दोन धावा करून बाद झाला. या सामन्यात रिंकू सिंगने ११ धावांची खेळी केली आणि तो पॅव्हेलियनमध्ये परतला. अक्षर पटेलने सात धावा केल्या.



## रणजी ट्रॉफीत मुंबईने ओडिशाला चारली धूळ

### शम्स मुलाणीचा भेदक मारा

**मुंबई : प्रतिनिधी**

गतविजेत्या मुंबईने शनिवारी (दि. ९) रणजी करंडक स्पर्धेतील एलिट गटाच्या सामन्यात ओडिशाचा एक डाव आणि १०३ धावांनी पराभव केला. या विजयात मुंबईसाठी फिरकीपटू शम्स मुलाणी (५/७१) आणि हिमांशू सिंग (४/७७) यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या सामन्यातील शानदार कामगिरीसाठी मुलाणीला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. त्याने एकूण ११ विकेट्स घेतल्या.

या सामन्यात यजमान संघाने चार बाद ६०२ धावांवर डाव घोषित केला होता. मुंबईचा कर्णधार अजिंक्य रहाणेने फॉलोऑन दिल्यानंतर ओडिशाचा संघ दुसऱ्या डावात २१४ धावांत गारद झाला. पहिल्या डावात त्याला केवळ २८५ धावा करता आल्या. शेवटच्या दिवशी पाच बाद १२६ धावांवर खेळत असताना अर्धशतक पूर्ण केल्यानंतर लगेचच यष्टीरक्षक फलंदाज आशीर्वाद स्वेन (५१) याला मुलाणीने बाद केल्याने ओडिशाच्या आशा मावळल्या.

# संजू सॅमसनने शतकासह घडवला इतिहास

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

संजू सॅमसनने १० षटकारांसह दणदणीत शतक झळकावत दक्षिण आफ्रिकेच्या मैदानावर विस्फोटक फलंदाजी केली. संजूने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात वादळी फलंदाजी करत आपले सलग दुसरे टी-२० शतक केले. या शतकासह संजूने मोठा इतिहास घडवला आहे.

संजूने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात ४७ चेंडूत शतक पूर्ण केले, मात्र शतक झळकावल्यानंतर तो जास्त वेळ क्रीजवर राहू शकला नाही आणि तो बाद झाला. त्याने ५० चेंडूत १० षटकार आणि सात चौकारांसह १०७ धावा केल्या.

संजू आता सलग दुसऱ्या सामन्यात टी-२० शतक झळकावत भारतासाठी शतक झळकावणाऱ्या फलंदाजांच्या यादीत दाखल झाला आहे.




आता तो या फॉरमॅटमध्ये सर्वाधिक शतकांच्या बाबतीत केएल राहुलसह संयुक्तपणे तिसऱ्या स्थानावर पोहचला आहे. माजी कर्णधार रोहित शर्मा आणि सध्याचा टी-२० कर्णधार सूर्यकुमार यादव प्रत्येकी चार शतकांसह संयुक्तपणे अव्वल स्थानावर आहेत.


संजूने बांगलादेशविरुद्धच्या टी-२० सामन्यात झटपट प्रकारातील पहिले शतक झळकावले होते.

आता संजूने सलग पुढच्याच सामन्यात आफ्रिकेविरुद्ध दुसरे शतक झळकावत कोणालाही जमली नाही अशी कामगिरी करून दाखवली आहे. आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये सलग दोन सामन्यांमध्ये शतके झळकावणारा तो भारताचा पहिला खेळाडू ठरला आहे. त्याच्यापूर्वी कोणत्याही भारतीय खेळाडूला ही कामगिरी करता आली नव्हती. सलग दोन टी-२० सामन्यात शतके झळकावणारा संजू एकूण चौथा खेळाडू ठरला आहे. त्याने गुस्ताव्ह मॅकॉन, रायली रूसो, फिल सॉल्ट यांची बरोबरी केली आहे.

### सर्वाधिक षटकार लगावणारा संयुक्त भारतीय फलंदाज

संजू सॅमसनने आफ्रिकेविरुद्धच्या १०७ धावांच्या खेळीत सर्वाधिक १० षटकार लगावत रोहित शर्माची बरोबरी केली आहे. रोहित शर्माने २०१७मध्ये इंदोरमध्ये झालेल्या श्रीलंकेविरुद्धच्या सामन्यात एका खेळीत १० षटकार लगावले होते. यासह संजूने रोहित शर्माची बरोबरी केली आहे.

> मी मैदानावर माझ्या वेळेचा खूप आनंद घेत आहे. मला माझ्या फॉर्मचा पुरेपूर फायदा करून घ्यायचा होता. सर्व काही ठीक चालले आहे. मी संघाला नेहमीच स्वत:पेक्षा पुढे ठेवले आहे. जेव्हा आपण पहिले दोन बॉल खेळतो, तेव्हा आपण मोठे शॉट खेळण्याचा प्रयत्न करतो. यामुळे गोष्टी सोप्या होतात. काहीवेळा तेच काम करते, तर कधी नाही. आज त्याचा फायदा झाला.
>
> **-संजू सॅमसन**



# ऑस्ट्रेलिया अ संघाविरुद्ध ऋतुराज ब्रिगेडचा दारुण पराभव

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलिया अ संघाने दुसऱ्या अनधिकृत कसोट सामन्यात ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखालील भारत अ संघावर सहा गडी राखून विजय मिळवला. यासह यजमानांनी टीम इंडियाचा २-० असा व्हाईटवॉश केला.

भारताला पहिल्या कसोटीत सात गडी राखून पराभव स्वीकारावा लागला होता. दुसऱ्या कसोटीत भारत अ संघाने 'कांगारू'समोर विजयासाठी १६८ धावांचे लक्ष्य ठेवले होते. ही धावसंख्या ऑस्ट्रेलिया अ संघाने केवळ चार विकेट गमावून गाठली. ऑस्ट्रेलियासाठी दुसऱ्या डावाचा हिरो सॅम कोन्स्टास होता, ज्याने ७३ धावांची नाबाद खेळी केली.

१६८ धावसंख्येचा बचाव करताना टीम इंडियाने चांगली सुरुवात केली होती. वेगवान गोलंदाज प्रसिद्ध कृष्णाने डावाच्या पहिल्याच षटकात मार्कस हॅरिस आणि कॅमेरून बॅनक्रॉफ्ट यांना बाद करून भारताला झटपट बळी मिळवून दिले. यानंतर मुकेश कुमारने ऑस्ट्रेलियन कर्णधार नॅथन मॅकस्विनी आणि तनुष कोटियनने ऑलिव्हर डेव्हिसला बाद करून भारताला आणखी दोन यश मिळवून दिले, मात्र त्यानंतर भारतीय गोलंदाजांना एकही विकेट घेता आली नाही.

भारताचा दुसरा डाव २२९ धावांवर संपला. यष्टीरक्षक ध्रुव जुरेलने दुसऱ्या डावातही आपली छाप सोडली. त्याने ६८ धावांची शानदार खेळी खेळली. त्याच्याशिवाय तनुष कोटियनने ४४, नितीश रेड्डीने ३६ आणि प्रसिद्ध कृष्णाने २९ धावा जोडल्या. कोरी रोचिओली हा ऑस्ट्रेलियाचा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने सर्वाधिक चार बळी घेतले.

## चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी भारत-पाकिस्तान आमनेसामने!



### अंडर-१९ आशिया चषक स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर

**दुबई : वृत्तसंस्था**

आशियाई क्रिकेट परिषदेने १९ वर्षाखालील आशिया चषक स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर केले आहे. ही स्पर्धा नोव्हेंबर ते ८ डिसेंबरदरम्यान युएईमध्ये आयोजित केली जाणार आहे. त्यामुळे आगामी चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी क्रिकेट चाहत्यांना या स्पर्धेत भारत विरूद्ध पाकिस्तान संघात सामना पाहायला मिळणार आहे. उभय संघ ३० नोव्हेंबर रोजी आमनेसामने असणार आहेत.

यंदाच्या अंडर-१९ आशिया चषक स्पर्धेत आठ संघ सहभागी होत असून त्यामध्ये भारत, पाकिस्तान, अफगाणिस्तान, श्रीलंका, बांगलादेश, नेपाळ, जपान आणि युएई या संघांचा समावेश आहे. या आठ संघांची दोन गटात विभागणी करण्यात आली असून एका गटात चार संघ आहेत. पाकिस्तान, यूएई, जपान आणि भारत या संघांना अ गटात, तर बांगलादेश, अफगाणिस्तान, नेपाळ आणि श्रीलंका या संघांना ब गटात ठेवण्यात आले आहे.

यंदाच्या अंडर-१९ आशिया चषकातील पहिला सामना गतविजेता संघ बांगलादेश विरूद्ध अफगाणिस्तान संघात होणार आहे, तर या स्पर्धेचा फायनल सामना ८ डिसेंबर रोजी होणार आहे. या स्पर्धेतील दुसऱ्या सामन्यात भारत-पाकिस्तान भिडणार आहेत.



## गोशीन रियू कराटे कॅम्पचे उद्घाटन

**उरण : बातमीदार**

गोरबंजारा ज्ञानपीठ लोधिवली येथे गोशीन रियू कराटे असोसिएशनचे ३७वे राष्ट्रीय कराटे ट्रेनिंग कॅम्प आयोजित करण्यात आला. या शिबिरात ७० विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

कराटे कॅम्पमध्ये मुलांना लाठीकाठी, तलवार, नानचाकू, स्टोनफा अशी कराटेची विविध कौशल्ये शिकविली जातात, जेणेकरून मुले सक्षम बनवून विविध स्पर्धांमध्ये खेळू शकतात. या शिबिराचे उद्घाटन उद्योगपती किसन राठोड यांच्या हस्ते झाले.

कॅम्पचे आयोजन सिहान राजू कोळी यांनी केले. गोपाळ म्हात्रे, परेश पावसकर, भूषण म्हात्रे, भूपेंद्र माळी, रेश्मा माळी, अंजा माने, रियाज अन्सारी, सुलभा कोळी, निकिता कोळी, शितल गणेशकर, राकेश म्हात्रे, विघ्नेश कोळी, अमिता घरत, प्रशिक्षक यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## भारताच्या कसोटी संघात पुजारासाठी स्थान असावे -उथप्पा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा अलीकडेच न्यूझीलंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत ३-० असा पराभव झाला. यानंतर आता भारत आणि ऑस्ट्रेलिया संघात पाच सामन्यांची बॉर्डर-गावसकर मालिका खेळली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर माजी भारतीय खेळाडू रॉबिन उथप्पाने संघात अनुभवी चेतेश्वर पुजारासाठी स्थान आहे, असे मत व्यक्त केले आहे.

उथप्पाने ऑनलाइन मीडियाशी बोलताना सांगितले की, आम्हाला बचावात्मक खेळाडूची गरज आहे. सध्या केएल राहुल व अभिमन्यू इस्वरन हे खेळाडू अशी भूमिका करू शकतात, तर बाकी सगळे त्यांच्याभोवती आहेत. खरे सांगायचे तर मला अजूनही वाटते की, पुजारासारख्या खेळाडूला कसोटी संघात स्थान आहे.

## कोरिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत किरण जॉर्ज उपांत्य फेरीमध्ये दाखल

**इकसान सिटी : वृत्तसंस्था**

भारताच्या किरण जॉर्जने कोरिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेच्या (सुपर ३०० दर्जा) उपांत्य फेरीत धडक मारली. किरणने उपांत्यपूर्व फेरीत पाचव्या मानांकित जपानच्या ताकुमा ओबायाशीचा २१-१४, २१-१६ असा सरळ गेममध्ये पराभव केला.

जागतिक क्रमवारीत ४१व्या स्थानावर असलेल्या २४ वर्षीय किरणने ३४व्या स्थानावरील जपानी प्रतिस्पर्ध्यावर ३९ मिनिटात मात केली. उपांत्य फेरीत किरणसमोर आता अग्रमानांकित आणि जागतिक क्रमवारीत पाचव्या स्थानावर असलेल्या थायलंडच्या कुन्लावत वितिदसर्नचे आव्हान असेल. वितिदसर्नने चीनच्या लिऊ लियांगला २१-१५, २१-११ असे नमवले.

या स्पर्धेत भारताकडून केवळ किरणनेच सहभाग घेतला आहे. उपांत्यपूर्व फेरीतील सामन्याच्या पहिल्या गुणाच्या बरोबरीनंतर किरणने पहिल्या गेमला सातत्याने आघाडी राखली. गेमच्या मध्यानंतर काहीसा प्रतिकार करू शकलेल्या ओबायाशीने १५-६वरून पिछाडी १६-१२ अशी कमी केली, मात्र त्याला एवढेच समाधान मिळाले. त्यानंतर किरणने १७-१४ अशा स्थितीतून सलग चार गुणांची कमाई करताना पहिला गेम जिंकला.

दुसरा गेम चुरशीचा झाला. किरणने सुरुवातीला ७-३ अशी आघाडी मिळवली होती. ओबायाशीने पुढे ८-८ अशी बरोबरी साधली. त्यानंतर प्रत्येक गुणासाठी चुरस झाली. गेम १७-१६ अशा स्थितीत असताना किरणने पहिल्याप्रमाणे सलग चार गुणांची कमाई करताना गेमसह विजयावर शिक्कामोर्तब केले.

### पूना क्लब ओपन गोल्फ स्पर्धा

# रणदीप कोचर, क्षितिज नावेद कौल यांची संयुक्त आघाडी

**पुणे : प्रतिनिधी**

द पूना क्लब गोल्फ कोर्स आणि भारतातील व्यावसायिक गोल्फचे एकमेव अधिकृत नियामक मंडळ टाटा स्टिल प्रोफेशनल गोल्फ टूर ऑफ इंडिया (पीजीटीआय) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित द पूना क्लब ओपन गोल्फ स्पर्धेत चंडीगढच्या करणदीप कोचर आणि दिल्लीच्या क्षितिज कौल यांनी सलग दुसऱ्या दिवशी संयुक्त आघाडी कायम राखली.

पूना क्लब गोल्फ कोर्स येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत पहिल्या दिवशी आघाडीवर असलेल्या कोचर (६४-६६) आणि कौल (६४-६६) यांनी दुसऱ्या दिवशीही अप्रतिम कौशल्य दाखविले. त्यांनी दुसऱ्या फेरीत पाच-अंडर ६६चा स्कोअर



नोंदवल्यानंतर स्पर्धेतील निम्म्या टप्प्यांमध्ये १२-अंडर १३० अशी आघाडी कायम ठेवली.

टाटा स्टील पीजीटीआय मानांकनामधील अव्वल मानांकित खेळाडू वीर अहलावत आणि समर्थ द्विवेदी यांनीही ६६च्या फेरीत पुनरागमन करून ८-अंडर १३४वर तिसऱ्या क्रमांकावर बरोबरी साधली.

दहाव्या टी स्टार्टरवर असलेल्या करणदीप कोचरला दिवसाची चांगली सुरुवात करायला सांगता आली नसती कारण त्याने पार-४ दहाव्या दिवशी ३५ याड्‌र्सवरून ईगलची नोंद केली. त्यानंतर १३ आणि १६व्या शॉटला बर्डी मिळविली.

१८व्या आणि दुसऱ्या होलच्या बोगीने त्याने नियंत्रण गमावले नाही, कारण करणदीपने सातव्या दिवशी ईगल नोंदविण्यासाठी झाडांवरून चांगला रिकव्हरी शॉट मारला. कोचर याने १५ फुटांच्या बर्डीचे रूपांतरण केले.

क्षितिज कौलने पार-४ १४व्या ग्रीनला सलग दुसऱ्या दिवशी तेथे बर्डी पीकअप करण्यासाठी चालविले. त्यानंतर त्याने आणखी एक बर्डी मिळविला. कौलच्या जांभळ्या पॅचची सुरुवात त्याच्या उत्कृष्ट बंकर शॉटने पाचव्या चेंडूने झाली. ज्यामुळे टॅप-इन बर्डी झाला.

सन २०१९मध्ये पूना क्लब गोल्फ कोर्सवर आपले पहिले व्यावसायिक विजेतेपद जिंकणारा आणि त्याच ठिकाणी हौशी, ज्युनियर आणि सब-ज्युनियर स्पर्धा जिंकणाऱ्या क्षितिजने पार-वर १२ फुटांच्या रूपांतरणासह ईगलची नोंद केली.

शिवेंद्रसिंग सिसोदियाने दिवसातील सर्वोत्तम स्कोअर ६४ नोंदवला आणि ३५ स्थानांनी झेप घेत सात-अंडर १३५मध्ये पाचव्या स्थानावर बरोबरी साधली. बरोबरीत पाचव्या स्थानावर असलेले तीन गोल्फर हे गेल्या वर्षीचे टाटा स्टील पीजीटीआय रँकिंग चॅम्पियन ओम प्रकाश चौहान (६७), शौर्य भट्टाचार्य (६७) होते. आर्यन रूपा आनंद (६७) हे पाचव्या स्थानावर आहेत.

# अल्झारी जोसेफला रागात मैदान सोडणे पडले भारी!

**ब्रिजटाऊन : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिज-इंग्लंड तिसऱ्या एकदिवसीय सामन्यादरम्यान अल्झारी जोसेफ आणि कर्णधार शाई होप यांच्यात झालेल्या वादानंतर गोलंदाज तडकाफडकी मैदानाबाहेर गेला. या सर्व घटनेनंतर आता वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्डाने अल्झारी जोसेफवर कारवाई केली आहे.

वेस्ट इंडिज आणि इंग्लंडमध्ये एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेत विंडीज संघाने विजय नोंदवला, पण या मालिकेतील तिसरा सामना चांगलाच लक्षात राहण्यासारखा आहे. या सामन्यात अल्झारी जोसेफ आणि संघाचा कर्णधार होप यांच्यात वाद झाला होता. जोसेफ या वादानंतर थेट मैदानाबाहेर निघून गेला होता आणि त्यामुळे संघाला १० खेळाडूंसह खेळावे लागले.

### वेस्ट इंडिज बोर्डाची कारवाई



आता जोसेफला हा राग चांगलाच महागात पडला आहे. वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्डाने त्याच्यावर कारवाई केली आहे. त्याला दोन सामन्यांसाठी निलंबित करण्यात आले आहे.

क्रिकेट वेस्ट इंडिजने (सीडब्ल्यूआय) वेगवान गोलंदाज अल्झारी जोसेफवर कारवाई केली आहे. अल्झारी जोसेफ आणि कर्णधाराच्या प्रकरणाबाबत सीडब्ल्यूआयचे क्रिकेट संचालक माइल्स बास्कोम्बे म्हणाले, अल्झारीचे वर्तन क्रिकेट वेस्ट इंडिजच्या मूलभूत मूल्यांना सुसंगत नव्हते. अशा वागण्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही आणि परिस्थितीचे गांभीर्य पाहता आम्ही निर्णायक कारवाई केली आहे.

**जोसेफनेही मागितली माफी**

२७ वर्षीय वेगवान गोलंदाज जोसेफनेही आपल्या वर्तनाबद्दल जाहीर माफी मागितली आहे. मी कर्णधार शाई होप आणि माझ्या सहकारी खेळाडूंची माफी मागितली आहे. वेस्ट इंडिजच्या चाहत्यांचीही माफी मी मागतो. मला समजले आहे की, एका छोट्याशा चुकीचा मोठा परिणाम होऊ शकतो आणि मी सर्वांना निराश केले याबद्दल मला मनापासून खेद व्यक्त करतो.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com